# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## (२०१०-२०११)

## (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

बीड, नंदूरबार व गोंदिया जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व तसेच जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यांत येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना यासंबंधीचा अहवाल

# सहावा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला दिनांक २० एप्रिल २०११ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई ४०० ०३२.
एप्रिल, २०११

# अनुसूचित जमाती कल्याण समिती
# (२०१०-२०११)

## (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

बीड, नंदूरबार व गोंदिया जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या
अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व
तसेच जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यांत येणाऱ्या विविध
कल्याणकारी योजना यासंबंधीचा अहवाल

# सहावा अहवाल

एचबी २६६—१

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
## अनुसूचित जमाती कल्याण समिती
## (२०१०-२०११)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. हरिदास भदे, वि.स.स.

(३) श्री. रामरतनबापू राऊत वि.स.स.

(४) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.

(५) श्री. राजाराम ओझरे, वि.स.स.

(६) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.

(७) श्री. किसन कथोरे, वि.स.स.

(८) श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.

(९) ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स.

(१०) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.

(११) श्री. धनराज महाले, वि.स.स.

(१२) श्री. एम. एम. शेख, वि.प.स.

(१३) श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स.

(१४) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

(१५) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री. म. मु. काज, उप सचिव,

श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती),

श्री. आनंद रहाटे, कक्ष अधिकारी.

टीप :

(१) श्री. राजेंद्र मुळक, वि.प.स. यांची राज्यमंत्री पदी नियुक्ती झाल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या पदावर श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स. यांची दिनांक १७ फेब्रुवारी २०११ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आलेली आहे.

(२) प्रा. वसंत पुरके, वि.स.स. यांची उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा पदी नियुक्ती झाल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या पदावर श्री. हरिदास भदे, वि.स.स. यांची दिनांक ७ मार्च २०११ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आलेली आहे.

एचबी २६६—१ब

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
## अनुसूचित जमाती कल्याण समिती
## (२०१०-२०११)

समिती प्रमुख

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स.

सदस्य

(२) प्रा. वसंत पुरके, वि.स.स.

(३) श्री. रामरतनबापू राऊत वि.स.स.

(४) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.

(५) श्री. राजाराम ओझरे, वि.स.स.

(६) श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.

(७) श्री. किसन कथोरे, वि.स.स.

(८) श्री. उमाजी मंगळू बोरसे, वि.स.स.

(९) ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स.

(१०) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.

(११) श्री. धनराज महाले, वि.स.स.

(१२) श्री. एम. एस. शेख, वि.प.स.

*(१३) रिक्त

(१४) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

(१५) श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री. म. मु. काज, उप सचिव,

श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती),

श्री. आनंद रहाटे, कक्ष अधिकारी.

टीप :

*(१) श्री. आनंदराव गेडाम वि.स.स यांची विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीवर समिती प्रमुख म्हणून नियुक्ती झाल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या पदावर प्रा. वसंत पुरके वि.स.स यांची दिनांक १३ ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आलेली आहे.

*(२) श्री. राजेंद्र मुळक, वि.प.स. यांची राज्यमंत्री पदी दिनांक १९ नोव्हेंबर २०१० रोजी नियुक्ती झालेली असल्याने जागा रिक्त.

## प्रस्तावना

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा सहावा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

समितीने बीड, नंदूरबार व गोंदिया जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व तसेच जिल्हा परिषदेमार्फत अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत माहिती घेण्याचे ठरविले. त्यानुसार समितीने दिनांक १३ मे २०१० रोजी बीड जिल्हा परिषद, दि.२८ जून २०१० नंदूरबार व ४ ऑगस्ट २०१० रोजी गोंदिया जिल्हा परिषद कार्यालयास दिलेल्या प्रत्यक्ष भेटीच्या वेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. उक्त बैठकीच्या वेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्द्यांच्या अनुषंगाने दिनांक ११ फेब्रुवारी २०११ रोजी एकत्रितरित्या विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीवर सखोल विचार करून समितीने त्या संदर्भात नोंदविलेले आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

विभागीय सचिवांनी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने प्रारूप अहवाल दिनांक १३ एप्रिल २०११ रोजीच्या बैठकीत विचारात घेतला व तो संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १३ एप्रिल २०११

**सुरेश धस,**
समिती प्रमुख,
अनुसूचित जमाती कल्याण समिती.

## अहवाल

### बीड जिल्हा परिषद

### (१) जिल्हा परिषद कार्यालयात अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची झालेली बोगस भरती व प्राप्त तक्रार

१.१ अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १३ व १४ मे २०१० रोजी जिल्हा परिषद, बीड या कार्यालयास भेट दिली. जिल्हा परिषद कार्यालयातील वर्ग ३ व ४ च्या कर्मचारी वर्गाच्या सेवासंदर्भात अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीच्या जनतेसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबत दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने आढावा घेत असताना समितीला श्री. पुरमवार व श्री. गुरले यांच्या प्रकरणी तक्रार प्राप्त झाली. समितीने प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार श्री. गणेश शेषराव पुरमवार, श्री. संतोष रामकिशन गोरले व इतर उमेदवारांनी कंत्राटी ग्रामसेवक या पदाची रीतसर भरती प्रक्रिया पूर्ण करूनही त्यांना अद्याप नियुक्ती दिलेली नाही. ते अनुसूचित जमातीचे आहेत आणि त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सन २००७ मध्ये सादर करून सुद्धा तीन वर्षे पूर्ण होऊन देखील त्यांना नियुक्ती दिली जात नाही. कंत्राटी ग्रामसेवक भरती संचिका सामान्य प्रशासन व पंचायत विभाग यांच्याकडे सतत तीन वर्षांपासून रेंगाळलेली आहे असे त्यांनी अर्जात म्हटले आहे. याबाबत सबंधितांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे अशी समितीने विचारणा केली. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी असे सांगितले की श्री. पुरमवार आणि श्री. गुरले यांची नस्ती प्राप्त झाली असून नियुक्तीसाठी दिलेली आहे. त्यांनी २००७ मध्ये वैधता दिलेली आहे. या प्रकरणाची पूर्ण नस्ती बघून चौकशी करण्यात येईल आणि जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले. समितीने ज्यांनी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचा हक्क हिरावून घेतला आहे त्यांच्यावर कारवाई होणे अभिप्रेत आहे. त्यांनी सन २००७ मध्ये जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यानंतर तीन वर्ष उलटून गेली असता, सन २०१० पर्यंत त्यांना कंत्राटी ग्रामसेवक म्हणून कोणी ऑर्डर दिलेली नाही त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र देऊनही अद्याप पर्यंत नियुक्तीचे आदेश मिळालेले नाही. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जबाबदार अधिकाऱ्यावर कारवाई करावी. तसेच जात प्रमाणपत्र दाखल करण्यास सांगितल्यानंतर त्यांनी दिनांक ६ फेब्रुवारी २००७ रोजी कागदपत्रे सादर केली त्याच वेळेस आपणाकडून जात वैधता समितीला कळविणे आवश्यक होते. परंतु सदर बाब संबंधित जात पडताळणी समितीला कळविण्यात आलेले नाही, त्यामुळे श्री. पुरमवार व श्री. गुरले यांच्यावर अन्याय झालेला असून त्यांचे नियुक्तीचे आदेश तात्काळ काढण्याबाबत संबंधितांना कळविण्यात यावे व विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

१.२ समितीने दिलेल्या निदेशानुसार दिनांक ११ फेब्रुवारी, २०११ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या मुद्यांच्या अनुषंगाने समितीला खालील प्रमाणे लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली. दिनांक २१ सप्टेंबर, २००५ रोजी झालेल्या नियुक्तीच्या संदर्भात १२ उमेदवारांना या कार्यालयाचे दिनांक ३१ मे, २००६ पत्रान्वये जात वैधता प्रमाणपत्र दाखल करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय आपणास कंत्राटी ग्रामसेवक पदावर नियुक्ती पत्र दिले जाणार नाही असे जिल्हा बैठकीनंतर कळविण्यात आलेले असतांना सुद्धा उमेदवारांनी अद्यापपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. तसेच नियुक्त करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या जागेवर जाहिरात देऊन दुसऱ्या उमेदवारांची निवड करता येईल काय किंवा यामध्ये निश्चित कोणती कार्यवाही करण्यात यावी याबाबत प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, यांना दिनांक १८ मे २००६ च्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविण्यात आले होते. तथापि याबाबत शासनाकडून अद्यापपर्यंत मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

१.३ सहाय्यक आयुक्त (मावक) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचेकडून दिनांक १९ जून २००७ रोजी ग्रामसेवक या संवर्गाची बिंदूनामावली नोंदवही तपासण्यात आली. त्यामध्ये अनुसूचित जमातीचे १२ पदे अतिरिक्त भरण्यात आलेले असल्याने त्यांचे समायोजन करण्यात यावे असे अभिप्राय देण्यात आले. श्री. गणेश शेषेराव पुरमवार, रा. नांदेड या उमेदवाराने दिनांक १४ फेब्रुवारी २००७ रोजी व श्री. संतोष गुरले, रा.अंबाजोगाई यांनी दिनांक १६ ऑक्टोबर २००६ रोजी जात वैधता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केले आहे. दोन उमेदवारांनी वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर निवड केल्याप्रमाणे उर्वरित १० उमेदवार हे अनुसूचित जमातीच्या आरक्षणात अतिरिक्त असल्याने त्यांना खुल्या पदावर कंत्राटी ग्रामसेवक म्हणून प्रशिक्षण व नियुक्ती देण्याबाबत परवानगी द्यावी किंवा सदरील उमेदवारांना खुल्या प्रवर्गातून नियुक्ती पत्र द्यावे किंवा कसे याबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दिनांक १० डिसेंबर २००७ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविले होते. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी त्यांचे दिनांक ४ मार्च २००८ रोजीचे पत्रान्वये सदरील उमेदवारांची निवड ही अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातून झालेली असल्याने सदरील उमेदवारांना खुल्या प्रवर्गातून नियुक्ती देता येणार नाही असे कळविले आहे. त्यामुळे या उमेदवारांना नियुक्ती देता आली नाही. प्रस्तुत प्रकरणात जिल्हा परिषद स्तरावरुन शासनास व विभागीय आयुक्त, कार्यालयाकडे सातत्याने पत्र व्यवहार करूनमार्गदर्शन मागविण्यात आल्याने या प्रकरणी विलंब झालेला आहे.

१.४ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २७ जून, २००८ व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक १ नोव्हेंबर २००८ अन्वये कंत्राटी ग्रामसेवकांची ९८ नविन पदे निर्माण करण्यात आली. अनुसूचित जमातीच्या उमेदवाराची निवड

झाल्यापासून दीड ते दोन वर्ष जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे पदस्थापना देण्यात आलेली नाही. दोन वर्षानंतर जात वैधता प्रमाणपत्र दोन उमेदवारानी सादर केल्यानंतर या प्रकरणाबाबत मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दिनांक १३ ऑगस्ट २०१० रोजी मार्गदर्शन मागविले यावर मा. विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी दिनांक ९ ऑगस्ट, २०१० (रोजीच्या प्राप्त दिनांक १४ सप्टेंबर २०१०) निवड समितीने तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा निवडसूची तयार केल्याच्या दिनांकापर्यंतची रिक्तपदे विचारात घेण्यात आली आहेत, त्या दिनांकापर्यंत, जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राह्य ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल अशा सूचना आहेत. त्यानुसार प्रस्तुत प्रकरणात निवड केलेले उमेदवार हे सन २००५ या वर्षातील निवड यादीतील असल्याने त्यांना आता ५ वर्षानंतर नियुक्ती देता येणार नाही. त्यानुसार श्री. पुरमवार व श्री. संतोष गुरले यांना या कार्यालयाचे दिनांक ६ डिसेंबर २०१० रोजीच्या पत्रान्वये आपली निवड ही २००५ या वर्षातील निवड यादीतील असल्याने आपणांस ५ वर्षानंतर नियुक्ती देता येणार नाही, असे कळविले तथापि श्री. गणेश शेषराव पुरमवार या उमेदवाराने मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट याचिका क्रमांक ८१४९/२०१० दिनांक १० ऑगस्ट २०१० रोजी दाखल केली. यामध्ये मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेआदेश CIVIL/D.D./NO.23126 OF 2010 DATED २२ ऑक्टोबर २०१० च्या आदेशान्वये श्री. पुरमवार यांना नियुक्तीचे आदेश देण्याबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार श्री. पुरमवार यांना नियुक्तीचे आदेश देण्याची कार्यवाही चालू आहे.

१.५ उक्त प्रमाणे दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीच्या दिनांक ११ फेब्रुवारी २०११ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने श्री. गणेश पुरमवार हे नियमानुसार पात्र असताना सुद्धा त्यांना कंत्राटी ग्रामसेवक पदावर नियुक्ती देण्यास विलंब झाला आहे श्री. पुरमवार यांना नियुक्तीचे पत्र केव्हा दिले आहे. तसेच श्री. गुरले यांना नियुक्ती दिली आहे काय, अशी समितीने विचारणा केली. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी ग्राम सेवकाला प्रशिक्षकाचे आदेश देण्यात येतात त्याप्रमाणे दिनांक ५ फेब्रुवारी २०११ ला श्री. पुरमवार यांना प्रशिक्षणाचे आदेश देण्यात आलेले आहेत. ग्रामसेवक प्रशिक्षण पूर्ण करून आल्यानंतर त्यांना घेण्यात येईल. परंतु श्री. गुरले यांना अद्याप नियुक्ती देण्यात आलेली नाही असे समितीला सांगितले. समितीने शिफारस केल्यानंतरही व उच्च न्यायालयाने आदेश दिल्याच्या तीन महिन्यानंतर श्री. पुरमवार यांना साक्षीच्या बैठकीच्या ६ दिवस अगोदर नियुक्तीचे आदेश दिले आहेत. म्हणजेच साक्षीची बैठक लावलेली असल्यामुळे जिल्हा परिषद कार्यालयाकडून नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांच्या मनात कोणता हेतू आहे हे स्पष्ट होते असे समितीचे ठाम मत आहे. त्यामुळे विलंबाने नियुक्तीचे आदेश काढणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांच्या विरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी असे समितीने निर्देश दिले.

१.६ बीड जिल्हा परिषदेमध्ये १९ कर्मचारी निलंबित झाले होते. १९ कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता यादी डावलून प्रतिक्षा यादीच्या नावाखाली बोगस नियुक्त्या झाल्याचे विभागीय आयुक्तांच्या चौकशीत निष्पन्न झाले होते. या प्रकरणात अनुसूचित जमातीच्या लोकांवर अन्याय झाला आहे. याची चौकशी करण्यात आली आहे काय अशी समितीने विचारणा केली सचिव, ग्रामविकास विभाग यांनी या संदर्भात कारवाई केलेली असून विभागीय आयुक्तांमार्फत चौकशीचे आदेश देण्यात आलेले आहेत. या प्रकरणी चौकशी सुरू केली आहे, असे समितीला अवगत केले. या विषयाच्या अनुषंगाने श्री.खाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व श्री. मनोज चौधर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय, बोगस नियुक्त्या कशा झाल्या या संदर्भात जिल्ह्यातील वर्तमान पत्रात बातम्या येत आहेत. बोगस नियुक्तीद्वारे श्री. मनोज चौधर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या जवळच्या नातेवाईकांना नोकरीला लावले आहे या प्रकरणाची आयुक्तांनी गंभीर दखल घेऊन चौकशी केली असता चौकशीत बोगस नियुक्त्या झाल्या असल्याचे स्पष्ट झाले आहे. एक उमेदवार नियुक्त व्हायला गेला तेव्हा जिल्हा परिषदेकडून नियुक्ती आदेश घेऊन ये असे त्याला सांगण्यात आले त्यावेळी त्याने जिल्हा परिषदेकडून नियुक्तीचे पत्र आणले आहे तेव्हा आपण मला नियुक्त करून घ्या असे विचारणा केली, त्यावर मुख्याध्यापकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून ऑर्डर घेऊन ये असे सांगितले. श्री. चौधर यांनी डायरेक्ट बोगस नियुक्ती ऑर्डर दिलेल्या आहेत व मुख्याध्यापकांना सांगितले की, नियुक्ती करून घेण्यात यावी. या चौकशीमध्ये तीन लोक दोषी आढळून आले आहेत अशी समितीने पृच्छा केली त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी तीन बोगस ऑर्डर निदर्शनास आलेल्या आहेत त्याबाबतीत कुठलीही नस्ती मिळाली नाही. पहिले नाव श्री.सुरेश तारे असे होते. ती बाब माझ्या निदर्शनास आल्यानंतर पोलिसात गुन्हा नोंदवून शिक्षण विभागाला प्रस्ताव पाठविला आहे. आस्थापना विभागाच्या लिपिकाला निलंबित केले असून त्याची चौकशी सुरू आहे. चौकशीमध्ये आणखी जास्त लोक दोषी आढळून येतील अशी समितीला माहिती दिली.

१.७ श्री. पुरमवार यांना साक्षीच्या बैठकीपूर्वी नोकरीमध्ये घेतले आहे. परंतु १९ लोकांना ज्येष्ठता यादी डावलून नियुक्ती दिली आहे अशा बोगस नियुक्ती पत्राच्या आधारे नोकऱ्या मिळविणारे १९ लोक बोगस आहेत असे उघड झालेले असल्याने त्यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करून त्यांच्यावर जिल्हा परिषद कार्यालयमार्फत फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले नाहीत. अशी समितीने पृच्छा केली त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ही भरती प्रक्रिया २००७ मधील आहे. त्या भरती संबंधीची प्रतिक्षा यादी यापुर्वीच तयार केली होती आणि त्या प्रतिक्षा यादीप्रमाणे नियुक्त्या करण्यात आल्या होत्या. प्रशासनाचे असे मत होते की, अनुसूचित जमातीच्या अतिरिक्त १० उमेदवारांची नियुक्ती झाली असल्यामुळे या दोघांना घेता येत नाही. श्री. पुरमवार यांनी कोर्टात जाऊन आदेश आणले म्हणून त्यांना घ्यावे लागले असे समितीला सांगितले.

१.८ अनुसूचित जमातीचे १० उमेदवार जास्तीचे घेण्यात आले असतील तर या संबंधीची जाहिरात कोणी दिली आहे. तसेच आंतर जिल्हा बदलीने अनुसूचित जमातीचा एक उमेदवार येणार आहे त्यासाठी जागा रिक्त ठेवावी असे उत्तरात म्हटले आहे. याबाबत विभागाने अधिक खुलासा करावा अशी समितीने विचारणा केली. सचिव, ग्रामविकास विभाग यांनी रजिस्टर पडताळणी केली नाही या बाबीखाली दर वर्षी भरती थांबू नये म्हणून जाहिरात काढली होती, पडताळणीमध्ये १० अतिरिक्त पदे निदर्शनास आली. रोस्टर दर तीन-तीन वर्षनी तपासले जाते त्यामुळे रिक्त पदांचा अंदाज घेऊन जाहिरात काढली जाते. अन्यथा दोन-तीन वर्षे नोकरभरती थांबली असती याबाबतही विचार करणे आवश्यक आहे. अनुसूचित जमातीच्या लोकांना भरती प्रक्रियेपासून वंचित रहावे लागू नये म्हणून अंदाज घेऊन जाहिरात काढण्यात येते असे समितीला सांगितले. समितीने बीड जिल्ह्यामध्ये अनुसूचित जमातीची १० अतिरिक्त पदे भरण्यात आलेली आहेत असे आपले म्हणणे आहे पण ते शक्य नाही. त्या ठिकाणी १० जागा शिल्लक असणार, परंतु १० जागा जास्तीच्या होऊ शकत नाहीत. कोणत्या आधारावर जाहिरात देण्यात आली होती या संदर्भात आपण स्वतः ही बाब तपासून घ्यावी आणि महिन्याभरात समितीला माहिती पाठवून द्यावी. श्री.पुरमवार यांना नोकरीत घेण्यात यावे असे समितीने सांगितले असतानासुद्धा त्यांना घेण्यात आले नाही इतकेच नव्हे तर उच्च न्यायालयाने दिनांक २२ ऑक्टोबर, २०१० ला आदेश देऊनही तीन महिने उलटून गेल्यानंतर त्यांना नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहे. श्री. पुरमवार आणि श्री. गुरले यांची निवड एकाच दिवशी झालेली असताना श्री. गुरले यांना न घेतल्यामुळे त्यांचे नुकसान झालेले आहे. श्री. पुरमवार आणि श्री. गुरले यांनी जातीचे वैधता प्रमाणपत्र आणल्यानंतर श्री. मनोज चौधर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद यांनी या दोघांना पैसे मागितले, पैसे दिल्याशिवाय नियुक्तीचे आदेश देणार नाही असे सांगण्यात आले. त्यामुळे श्री.पुरमकर यांनी माझ्या जवळ पैसे नाहीत, मी व्हॅलिडीकास्टचा माणूस आहे. मी पैसे देणार नाही असे म्हटल्यानंतर मी तुझे बघून घेतो असे सांगून अनूसूचित जमातीच्या माणसाला नियुक्ती न देता बोगस लोकांना नियुक्ती दिली आहे म्हणून या संपूर्ण प्रकरणाची तपासणी सचिवांनी करावी. तसेच श्री. मनोज चौधर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांच्यावर जी काही कडक कारवाई करता येईल ती कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा.

१.९ बिंदू नामावली पूर्ण झाल्याशिवाय आणि रजिस्टर तपासून घेतल्याशिवाय जाहिरात कोणी काढली या विभागातील किती पदे रिक्त झाली आणि त्यामुळे किती पदे निर्माण झाली याची माहिती घेऊन जाहिरात दिलेली नसून अधिकाऱ्यांच्या मनमानीप्रमाणे जाहिरात दिली आहे, हे चुकीचे आहे, अशी समितीने पृच्छा केली असता सचिव, ग्रामविकास विभाग यांनी दर वर्षी जिल्हा परिषद सर्वांच्या एकदाच परीक्षा घेते. रजिस्टर न तपासता जाहिरात दिली तरी एक ते दोन पदांचा फरक पडतो. दिलेल्या माहितीप्रमाणे १० अतिरिक्त पदेही आहेत हि अतिरिक्त पदे कशी निर्माण झाली यांची तपासणी करण्यात येईल. या संबंधीच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. चौकशीनुसार कारवाई केली जाईल असे समितीला सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

१.१० समितीला प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार श्री. पुरमवार व श्री. गुरले व इतर उमेदवारांनी कंत्राटी ग्रामसेवक या पदाची भरती प्रक्रिया पूर्ण केलेली असतांना सुद्धा त्यांना नियुक्तीचे आदेश देण्यात आलेले नाही. श्री. पुरमवार व श्री.गुरले अनुसूचित जमातीचे आहेत त्यांनी तीन वर्षांपूर्वी म्हणजेच सन २००७ मध्ये त्यांना जात वैधता प्रमाणपत्र दाखल करण्यास सांगितल्यानंतर जिल्हा परिषद कार्यालयास दिनांक ६ फेब्रुवारी २००७ रोजी श्री.पुरमवार व श्री. गुरले यांनी जात वैधता प्रमाणपत्रासंबंधीचे कागदपत्रे सादर केली. परंतु कागदपत्रे सादर करण्यात आल्याचे जिल्हा परिषद कार्यालयाकडून जात वैधता पडताळणी समितीला कळविण्यात आलेले नाही. त्यामुळे श्री. पुरमवार व श्री. गुरले यांच्यावर अन्याय झालेला आहे. याप्रकरणी चौकशीची कारवाई पूर्ण करून ज्यांनी अनुसूचित जमातीच्या उमेदवाराचा हक्क हिरावून घेतला आहे, त्यांच्यावर कारवाई होणे समितीला अभिप्रेत आहे. तथापि, तीन वर्षे उलटून गेली असताना त्यांना सन २०१० पर्यंत कंत्राटी ग्रामसेवक म्हणून नियुक्तीचे आदेश दिलेले नाही. या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी असे समितीने निदेश दिले होते. परंतु अद्यापपर्यंत कोणत्याही जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात आल्याचे समितीला दिसून आलेले नाही. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची सन २००५ मध्ये निवड झाल्यानंतर दोन वर्षांनी श्री. पुरमवार व श्री. गुरले यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले असता विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी निवड समितीने तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करतांना रिक्त पदे दिलेल्या दिनांकापर्यंतच विचारात घेण्यात यावी त्यानंतर निवडसूची व्यपगत होते असे अभिप्राय देण्यात आले आहे. आयुक्त कार्यालयाने दिलेल्या अभिप्रायानुसार श्री. पुरमवार व श्री. गुरले यांना आपली निवड सन २००५ मध्ये झालेली असल्याने आपणास ५ वर्षांनंतर नियुक्ती देता येणार नाही असे त्यांना पत्राद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार श्री. पुरमवार यांनी उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल केली, न्यायालयाने श्री. पुरमवार यांना नियुक्ती आदेश देण्याबाबत दिनांक २२ ऑक्टोबर २०१० च्या आदेशान्वये आदेशित केले आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार श्री. पुरमवार यांना दिनांक ५ फेब्रुवारी २०११ ला प्रशिक्षणाचे आदेश देण्यात आले आहेत. परंतु श्री. गुरले यांना नियुक्तीचे आदेश देण्यात आलेले नाही. उच्च न्यायालयाने श्री. पुरमवार यांना नियुक्तीचे आदेश दिल्यानंतर तीन महिन्यांनी व साक्षीच्या बैठकीच्या ६ दिवस अगोदर नियुक्तीचे आदेश दिले आहेत, म्हणजेच जिल्हा परिषद कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांच्या मनात असलेला हेतू स्पष्ट झालेला आहे. नियुक्तीचे आदेश विलंबाने काढण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

१.११ श्री. गुरले हे न्यायालयात गेलेले नसल्याने त्यांना नियुक्तीचे आदेश देण्यात आले नाही. दोघांची प्रकरणे सारखीच असून श्री. गुरले यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे याप्रकरणी जिल्हा परिषद कार्यालयाने निर्णय घेऊन श्री. गुरले यांना नोकरीची संधी उपलब्ध करून द्यावी अशी ही समिती शिफारस करीत आहे.

१.१२ जिल्हा परिषदेच्या ग्रामसेवक या संवर्गाची बिंदूनामावली नोंदवहीची मागासवर्गीय कक्षाकडून तपासणी करण्यात आली असता या संवर्गात अनुसूचित जमातीचे १२ पदे अतिरिक्त भरण्यात आले असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यापैकी, श्री. पुरमवार व श्री. गुरले या उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयास सादर केल्यानंतर उर्वरित १० उमेदवार हे अनुसूचित जमातीच्या आरक्षणात अतिरिक्त असल्याने त्यांना खुल्या प्रवर्गातून कंत्राटी ग्रामसेवक म्हणून नियुक्ती देण्यात यावी किंवा नाही याबाबत विभागीय आयुक्त कार्यालयाकडून अभिप्राय मागविले असता निवड झालेले उमेदवार हे अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातून आलेले असल्याने त्यांना खुल्या वर्गातून नियुक्ती देता येणार नाही असे कळविलेले आहे. बिंदूनामावली नोंदवही दर तीन वर्षांनी तपासण्यात येत असल्याने रिक्त पदांचा अंदाज घेऊन जाहिरात दिली आहे अनुसूचित जमातीचे १० उमेदवार अतिरिक्त घेण्यात आले आहे. ग्रामसेवक पदाची दिलेली जाहिरात कोणत्या आधारावर देण्यात आली याबाबतची चौकशी करण्यात यावी व चौकशीत निष्पन्न झालेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

१.१३ बीड जिल्हा परिषदेमध्ये १९ कर्मचारी निलंबित करण्यात आले असताना निलंबित करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता यादी डावलून प्रतिक्षा यादीच्या नावाखाली बोगस लोकांच्या नियुक्त्या करण्यात आले आहे असे विभागीय आयुक्तांच्या चौकशीत निष्पन्न झालेले आहे. त्यामुळे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांवर अन्याय झालेला असून या प्रकरणाची चौकशी विभागीय आयुक्तांमार्फत अद्यापही सुरू आहे. या प्रकरणाची आयुक्तांमार्फत चौकशी केली असता चौकशीत श्री. चौधर, उप मुख्य कार्यकारी आधिकारी यांनी बोगस नियुक्तीचे आदेश दिलेले आहे. निलंबित करण्यात आलेल्या १९ कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता यादी डावलून बोगस लोकांच्या नियुक्त्या करण्यात आल्याचे उघड झालेले असल्याने या बोगस कर्मचाऱ्यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करण्यात यावे व त्यांच्याविरुद्ध जिल्हा परिषद कार्यालयाकडून फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत व नियुक्त्या करण्यात आलेल्या बोगस लोकांच्या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी आढळून येणाऱ्या इतर संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

(२) जिल्हा परिषद कार्यालयातील विभागांची बिंदुनामावली

नोंदवहीची तपासणी करणे : -

२.१ जिल्हा परिषद, बीड या कार्यालयातील विविध विभागांतर्गत कार्यरत असलेल्या संवर्गनिहाय राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी बिंदुनामावली (Roster) नोंदवही ठेवण्यात आली आहे काय व केव्हापासून अद्यावत स्वरूपात ठेवण्यात आली आहे अशी समितीने बैठकीच्या वेळी विचारणा केली असता जिल्हा परिषद कार्यालयाअंतर्गत भरावयाच्या सरळ सेवा व पदोन्नतीबाबत विभागनिहाय बिंदुनामावली नोंदवही मागासवर्गीय कक्षाकडून तपासून घेण्यात आलेली असून ती अद्यावत स्वरूपात ठेवण्यात आली आहे, अशी समितीला लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली.

२.२ समितीच्या दिनांक ११ फेब्रुवारी २०११ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी दिलेल्या माहितीमध्ये व जिल्हा बैठकीच्या वेळी दिलेल्या माहितीमध्ये विसंगती आढळून आली आहे. जिल्हा बैठकीमध्ये दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद कार्यालयात कार्यरत असलेल्या विभागापैकी, सामान्य प्रशासन विभागाची सन २०१० मध्ये मागासवर्गीय कक्षाकडून विविध संवर्गाच्या बिंदुनामावली नोंदवह्या तपासलेल्या असताना त्यामध्ये काही संवर्गात अनुशेष शिल्लक राहिलेला आहे. तो भरण्यात यावा, अशा सूचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने सरळ सेवा व पदोन्नतीच्या वेळी भरती करताना शिल्लक असलेल्या अनुशेषबाबत कार्यवाही करण्यात येईल अशी माहिती दिली.

२.३ पंचायत विभाग, जिल्हा परिषद अंतर्गत अनुसूचित जमातीच्या उमेदवारासाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदासाठी बिंदुनामावली नोंदवही सन १९७७ पासून अद्यावत स्वरूपात ठेवण्यात आली आहे. परंतु साक्षीच्या वेळी पंचायत विभागातील संवर्गनिहाय कर्मचाऱ्यांची सन २०१०-२०११ मध्ये बिंदुनामावली नोंदवही मागासवर्गीयकक्षाकडून तपासून घेणेबाबतची कार्यवाही सुरु आहे, अशी माहिती दिली.

२.४ शिक्षण विभाग जिल्हा परिषद अंतर्गत अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी बिंदुनामावली नोंदवही प्राथमिक शिक्षण संवर्गात सन २००१ पासून अद्यावत आहे तर माध्यमिक शिक्षण संवर्गात २००६ पर्यंत बिंदुनामावली अद्यावत ठेवली आहे. परंतु साक्षीच्या वेळी शिक्षण विभागातील संवर्गनिहाय बिंदुनामावली सन २००५ व २००७ पर्यंत तपासण्यात आलेली आहे. त्यानंतर नवीन प्रस्ताव तयार करून बिंदुनामावली नोंदवहीची तपासणी मागासवर्गीय कक्षाकडून करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे अशी माहिती दिली.

२.५ आरोग्य विभाग जिल्हा परिषद अंतर्गत राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी बिंदुनामावली नोंदवही आतापर्यंत (मे, २०१०) अद्यावत स्वरूपात ठेवण्यात आली आहे. परंतु साक्षीच्या वेळी आरोग्य विभागाची सरळ सेवा व पदोन्नतीसाठी विहित केलेल्या बिंदुनामावल्यांची मागासवर्गीय कक्षाकडून

सप्टेंबर, २००५ पर्यंत तपासणी करण्यात आली आहे. त्यानंतर बिंदुनामावली नोंदवही अद्यावत करण्यासाठी उप आयुक्त मागासवर्गीय कक्ष औरंगाबाद यांना सादर केली असता मागासवर्गीय कक्षाकडून दर्शविलेल्या त्रुटीची पूर्तता करण्यासाठी कार्यवाही चालु आहे अशी माहिती दिली.

२.६ बांधकाम विभाग जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या संवर्गनिहाय बिंदुनामावलीची तपासणी सन २००१ रोजी करून घेण्यात आलेली आहे. सन २०१० पर्यंतची बिंदुनामावली नोंदवह्या मागासवर्गीय कक्षाकडून तपासणीसाठी दिनांक १७ जुलै २००९ व ११ जून २०१० रोजी मागासवर्गीय कक्षाकडे सादर केल्या होत्या. परंतु त्यामध्ये त्रुटी दर्शवून त्या परत करण्यात आल्या आहेत. सदर त्रुटीची पुर्तता करून बिंदुनामावली नोंदवह्या मागासवर्गीय कक्षाकडून तपासणी करून घेण्याची कार्यवाही चालु आहे. अशी साक्षीच्या वेळी माहिती देण्यात आली.

२.७ जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या विविध विभागांतील संवर्गनिहाय बिंदुनामावली नोंदवही तपासणी प्रकरणी जिल्हा बैठकीच्या वेळी व साक्षीच्या वेळी दिलेल्या माहितीमध्ये विसंगती दिसून येते. साक्षीच्या वेळी समितीला दिलेल्या सुधारित माहितीमध्ये पंचायत विभागातील विस्तार अधिकारी (पंचायत), ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक/कंत्राटी ग्रामसेवक यांच्या तपासणीचा दिनांक सन २००७ दिलेला आहे. म्हणजेच पंचायत विभागाची तपासणी २००७ पासून आतापर्यंत झालेली नाही, नियमाप्रमाणे पंचायत विभागाची तपासणी २०१० ला करावयास पाहिजे होती. तथापि, ती करण्यात आलेली नाही अशी समितीने विचारणा केली. त्यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी पंचायत विभागाची तपासणी होऊन, ती फाईल दिनांक २४ जानेवारी २०११ ला आयुक्तांकडे गेलेली आहे त्यांच्याकडून मंजुरी मिळणे बाकी आहे असे समितीला सांगितले. समितीने शिक्षण विभागातील संवर्गनिहाय बिंदुनामावली प्रकरणी ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी दिनांक २९ डिसेंबर २००५, कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी दिनांक २९ डिसेंबर २००५ केंद्र प्रमुख दिनांक २१ सप्टेंबर २००७, माध्यमिक शिक्षक दिनांक २ सप्टेंबर २००६, प्राथमिक शिक्षक १४ ऑगस्ट २००९, शारीरिक शिक्षक दिनांक २९ डिसेंबर २००५, चित्रकला शिक्षक दिनांक २९ डिसेंबर २००५ पर्यंत या संवर्गाची बिंदुनामावली तपासणी केली असून यासंबंधीची अंतिम नस्ती दिनांक ५ फेब्रुवारी २०११ ला आयुक्तांकडे सादर केली आहे. समितीने सामान्य प्रशासन विभागातील शासन निर्णय दिनांक ५ नोव्हेंबर २००९ अन्वये बिंदुनामावली नोंदवह्या अद्यावत ठेवण्याबाबत स्पष्ट सूचना केलेल्या आहेत. परंतु जिल्हा परिषद, बीड या कार्यालयाने साक्षीची बैठक लावलेली असल्याने बैठकीपुर्वी बिंदुनामावली तपासणीच्या नस्ती आयुक्त कार्यालयाकडे तपासणीसाठी सादर केले आहे. याबाबत अधिक खुलासा करण्यात यावा अशी समितीने पृच्छा केली त्यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी सन २०१० पर्यंतच्या बिंदुनामावली नोंदवह्या मागासवर्गीय कक्षाकडून तपासणीसाठी दिनांक १७ जुलै २००९ व ११ जून २०१० रोजी सादर केल्या होत्या परंतु त्यामध्ये त्रुटी दर्शवून परत करण्यात आल्या आहेत. सदर त्रुटींची पुर्तता करून

बिंदुनामावली नोंदवह्या मागासवर्गीय कक्षाकडून तपासणी करून घेण्याची कार्यवाही चालू आहे असे समितीला सांगितले तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांनी शासनाने आरोग्य विभागाचा आकृतिबंध कमी केलेला आहे. हा आकृतिबध पूर्वीप्रमाणे ठेवावा अशी आरोग्य विभागाने विनंती केलेली आहे. आरोग्य सेवकाची एकूण २५४ पदे होती त्यामध्ये कपात करून ती १६३ करण्यात आलेली आहेत. परंतु सध्या जे जास्तीचे कर्मचारी आहेत ते कार्यरत आहेत. आरोग्य विभागाने बिंदुनामावली नोंदवही आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांचेकडे सादर केली होती परंतु आयुक्त कार्यालयाने सुधारित आकृतिबंध केल्याशिवाय बिंदुनामावलीची तपासणी करता येणार नाही असे सांगितलेले असल्याने प्रथम आकृतिबंधाचा प्रश्न सोडवावा लागेल असे समितीला सांगितले. आरोग्य विभागाने आकृतिबंध कमी केलेला आहे. या संदर्भात आरोग्य विभागाकडे विचारणा केली आहे काय अशी समितीने विचारणा केली असता सचिव, ग्रामविकास विभाग यांनी जिल्हा परिषदेमध्ये त्या त्या विभागाचा आकृतिबंध असतो. एखाद्या विभागाचा आकृतिबध कमी केल्यावर त्याची बिंदुनामावली पूर्णपणे बदलते. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने पदे कमी करू नयेत अशी विनंती केलेली आहे. परंतु त्यांची ही विनंती मान्य होईल असे वाटत नाही. आकृतिबंध कमी केल्यावरसुद्धा जास्तीचे कर्मचारी कार्यरत आहेत. तथापि, पदे पुनर्स्थापित (Restore) करण्याबाबत जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने शासनाकडे विनंती केलेली आहे असे समितीला सांगितले. समितीने जिल्हा परिषदेतील आरोग्य विभाग हा अत्यंत महत्त्वाचा व सामान्य जनतेशी निगडीत असलेला विभाग आहे त्यामुळे या विभागातील आरोग्य सेवकाची पदे कमी करण्यात आलेली पदे पुनर्स्थापित (Restore) करण्यात यावी, असे समितीचे ठाम मत असून शासनाच्या आरोग्य विभागाकडे कमी करण्यात आलेली पदे पुनर्स्थापित करण्यात यावी अशी मागणी केली आहे. समितीने या प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेऊन बिंदुनामावली नोंदवही तपासून घ्यावी जेणेकरून अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना न्याय मिळू शकेल. या दृष्टिने कार्यवाही करण्यात यावी.

२.८ बांधकाम विभागाची बिंदुनामावली तपासणीचा दिनांक सन २००१ देण्यात आलेला आहे. त्यानंतर या विभागाच्या बिंदुनामावलीची तपासणी झाली नाही काय, बांधकाम विभागाची बिंदुनामावली मागासवर्ग कक्षास ११ जून २०१० रोजी सादर करण्यात आली आहे. म्हणजेच मागील १० वर्षांत राखीव असलेल्या पदांमध्ये अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना व अन्य मागासवर्गीय उमेदवारांना नोकरीपासून वंचित ठेवण्यात आले असे समितीचे ठाम मत आहे व मागासवर्ग कक्षाकडून त्रुटीची पूर्तता करण्याबाबत कळविण्यात आल्यानंतरही त्रुटींची पूर्तता का करण्यात आलेली नाही, अशी समितीने पृच्छा केली. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सन २००१ मध्ये शेवटची

तपासणी करण्यात आली होती. त्यानंतर दिनांक १७ जुलै २००९ व दिनांक ११ जून २०१० रोजी बिंदुनामावली तपासणीसाठी पाठविण्यात आली होती. परंतु त्यामध्ये काही त्रुटी असल्या कारणाने बिंदुनामावली नोंदवही परत पाठविण्यात आली. त्यानंतर मागासवर्ग कक्षाकडून सांगण्यात आलेल्या त्रुटींची पूर्तता केलेली आहे. एक-दोन दिवसांत बिंदुनामावली नोंदवही मागासवर्ग कक्षाकडे तपासणीसाठी पाठविण्यात येईल असे समितीला सांगितले असता सचिव, ग्रामविकास विभाग यांनी जुलै महिन्यात मागासवर्ग कक्षाकडे रोस्टर सादर करण्यात आले होते. परंतु त्या संदर्भात त्रुटी कळविण्यात आल्यानंतर त्या बाबतीत लगेच पुर्तता करावयास पाहिजे होती. परंतु तसे न होता त्याकडे दुर्लक्ष झालेले आहे यापुढे बिंदूनामावली वेळच्या वेळी अद्यावत करून घेण्याबाबत सर्व विभागांना सूचना देण्यात येतील असे समितीला आश्वासित केले. मागासवर्ग कक्षाचे अधिकारी समितीच्या बैठकीस उपस्थित असतात. त्यांनीच समितीला सांगितले की, त्रुटींची पूर्तता करण्याबाबत वारंवार सांगूनही आपल्या विभागाकडून त्रुटींची पूर्तता केली जात नाही. दिनांक ११ जून २०१० रोजी मागासवर्ग कक्षाने त्रुटींची पूर्तता करण्यासाठी रोस्टर पुन्हा विभागाकडे पाठविले. परंतु आपणास त्रुटींची पूर्तता करावी असे वाटले नाही. दर तीन वर्षांनी बिंदूनामावली अद्यावत करावयाची असताना त्या अद्यावत करण्यात आलेल्या नाहीत या प्रकरणी ज्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केलेले आहे त्याच्यावर कारवाई करण्यात यावी, असे समितीने निदेश दिले असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी श्री. वाघमारे, अधीक्षक अभियंता यांनी सन २००८ मध्ये अधीक्षक अभियंता या पदाचा कार्यभार स्वीकारलेला आहे असे समितीला सांगितले.

२.९ दिनांक १७ सप्टेंबर २००९ व ११ सप्टेंबर२०१० रोजी मागासवर्ग कक्षाकडून त्रुटींची पूर्तता करण्याबाबत सांगण्यात आले. म्हणजेच श्री. वाघमारे, अधीक्षक अभियंता यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर बिंदुनामावली अद्यावत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ज्या अधिकाऱ्याकडे या कामाची जबाबदारी आहे त्याच्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. मागासवर्गकक्षाकडून त्रुटींची पूर्तता करण्यास सांगण्यात आल्यानंतर संबंधित अधिकाऱ्याने वेळेत त्रुटींची पूर्तता करणे आवश्यक होते. त्रुटींची पूर्तता करण्यास एक वर्षाचा कालावधी लागला आहे. आपण जोपर्यंत संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करीत नाही तोपर्यंत असे प्रकार होत राहणार आहेत. एखाद्या अधिकाऱ्यावर कारवाई केल्यास त्याचा संदेश इतर अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचतो. तेव्हा या प्रकरणी जे कोणी अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता सचिव, ग्रामविकास विभाग यांनी अधीक्षक अभियंता श्री.वाघमारे यांच्या अगोदर जे कोण अधिकारी होते याची माहिती घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी :

२.१० जिल्हा परिषद कार्यालयात कार्यरत असलेल्या विभागामध्ये सामान्य प्रशासन विभाग, पंचायत विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग व बांधकाम विभाग या कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी बिंदुनामावली नोंदवही अद्यावत स्वरुपात ठेवण्यात आलेली नाही तसेच या विभागातील संवर्गात अनुसूचित जमातीच्या पदांचा अनुशेष शिल्लक आहे. जिल्हा बैठकीच्यावेळी जिल्हा परिषद कार्यालयात कार्यरत असलेल्या विभागातील बिंदुनामावली नोंदवही अद्यावत स्वरुपात ठेवण्यात आली आहे असे सांगण्यात आले होते तथापि साक्षीच्या वेळी उक्त विभागाची बिंदूनामावली नोंदवही मागासवर्गीय कक्षाकडून तपासून घेणेबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच काही विभागातील बिंदुनामावली नोंदवह्या तपासणीसाठी मागासवर्गीय कक्षाकडे सादर केल्या असता त्यामध्ये त्रुटी असल्यांचे आढळून आलेले असल्याने, त्रुटीची पूर्तता करूनपुन्हा बिंदुनामावली नोंदवही मागासवर्गीय कक्षाकडून तपासून घेणेबाबतची कार्यवाही सुरु आहे असे समितीला सांगण्यात आले. समितीने साक्षीची बैठक लावलेली असल्यामुळे बैठकीपूर्वी बिंदुनामावली नोंदवही तपासणीसाठी नस्ती आयुक्ताकडे सादर केल्या आहेत. बिंदुनामावली नोंदवही प्रत्येक विभागाने शासन निर्णयानुसार दर तीन वर्षांनी अद्यावत करणे आवश्यक आहे परंतु जिल्हापरिषद बीड या कार्यालयातील संबंधित विभागांनी बिंदुनामावली नोंदवह्या मागासवर्गीय कक्षाकडे तपासणीसाठी दर तीन वर्षांनी सादर न करता विलंबाने सादर केली आहे. बिंदुनामावली नोंदवही तपासणीसाठी मागासवर्गीय कक्षाकडे सादर करण्यास ज्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून विलंब झालेला आहे. विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्याविरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तात्काळ पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे. तसेच संबंधित विभागाची बिंदुनामावली नोंदवही मागासवर्गीय कक्षाकडून तपासण्यात आली असता विभागनिहाय संवर्गात अनुसूचित जमाती पदाचा अनुशेष शिल्लक असल्याचे निदर्शनास आले आहे. जिल्हा परिषद कार्यालयातील विभागनिहाय शिल्लक असलेला अनुसूचित जमातीच्या अनुशेष तात्काळ भरण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

२.११ जिल्हापरिषद आरोग्य विभागात आरोग्य सेवकांची एकूण २५४ पदे कार्यरत असुन त्यामध्ये कपात करून ती १६३ पदावर आणण्यात आली आहेत. म्हणजेच शासनाने जिल्हा परिषद आरोग्य विभागाचा आकृतिबंध कमी केलेला आहे. जिल्हा परिषद आरोग्य विभागाने शासनाकडे (आरोग्य विभाग) कमी करण्यात आलेला आकृतिबंध पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात यावा अशी विनंती केलेली आहे. जि.प. आरोग्य विभागाने बिंदुनामावली नोंदवही मागासवर्गीय कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय यांच्याकडे तपासणीसाठी सादर केली असता आयुक्त कार्यालयाने सुधारित आकृतिबंध

केल्याशिवाय बिंदुनामावलीची तपासणी करता येणार नाही असे सांगण्यात आले. जिल्हापरिषदेमध्ये त्या-त्या विभागाच्या आकृतिबंध असल्याने एखाद्या विभागाचा आकृतिबंध कमी केल्यावर त्या विभागाची बिंदुनामावली पूर्णपणे बदली जाते सध्या बीड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात आकृतिबंध कमी केल्यानंतर सुद्धा जास्तीचे कर्मचारी कार्यरत आहेत. आरोग्य विभाग हा अत्यंत महत्त्वाचा व सामान्य जनतेशी निगडीत असल्याने या विभागातील आरोग्य सेवकाची कमी करण्यात आलेली पदे पुन्हा पुनर्स्थापित करण्यात यावी ज्यामुळे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनाही न्याय मिळू शकेल त्यादृष्टीने आरोग्य विभागाने या प्रकरणी त्वरित निर्णय घेऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

२.१२ जिल्हा परिषद बांधकाम विभागाची बिंदुनामावली नोंदवही सन २००१ मध्ये तपासणी करण्यात आली आहे. बांधकाम विभागाने दिनांक ११ जून २०१० रोजी बिंदुनामावली नोंदवही मागासवर्गीय कक्षाकडे तपासणीसाठी सादर केली आहे म्हणजेच मागील १० वर्षात या विभागाने बिंदुनामावली नोंदवहीची तपासणी मागासवर्गीय कक्षाकडून करून घेतलेली नाही. बिंदुनामावलीची तपासणी न करता बांधकाम विभागात भरती करण्यात आलेल्या उमेदवारांमध्ये अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेली पदे व अन्य मागासवर्गीय उमेदवारांना नोकरीपासून वंचित ठेवण्यात आले आहे तसेच मागासवर्गीय कक्षाकडून बिंदुनामावलीमध्ये करण्यात आलेली त्रुटीची पूर्तता पूर्ण करण्याकडे दुर्लक्ष झालेले आहे. दर तीन वर्षांनी बिंदुनामावली अद्यावत करावयाची असताना त्या अद्यावत करण्यात आलेल्या नाहीत मागासवर्गीय कक्षाकडून त्रुटीची पूर्तता आल्यानंतर त्रुटीची पूर्तता करण्यास एक वर्षाचा कालावधी लागलेला आहे. ज्या अधिकाऱ्याकडे या कामाची जबाबदारी आहे त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. या प्रकरणी जिल्हापरिषद बांधकाम विभागाच्या ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून बिंदुनामावली नोंदवही मागासवर्गीय कक्षाकडे वेळेत सादर करण्यास दुर्लक्ष केलेले आहे व मागील १० वर्षात बांधकाम विभागात भरती करण्यात आलेल्या उमेदवारांमध्ये अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना नोकरीपासुन वंचित ठेवण्यात आले आहे अशा जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

**(३) खाजगी शिक्षण संस्थेअंतर्गत सुरू असलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील अनुशेष :—**

**३.१** बीड जिल्ह्यात एकूण ३५० खाजगी शिक्षण संस्था कार्यरत आहेत. त्या संस्थेमध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील कर्मचाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. संस्थांमधील कर्मचाऱ्यांचा अनुशेष तपासण्याची जबाबदारी ही जिल्हा परिषदेची आहे. खाजगी शाळांवर शिक्षणाधिकाऱ्यांचे कोणतेही नियंत्रण नसल्याचे समितीच्या झालेल्या बैठकीमध्ये निदर्शनास आले आहे. खाजगी शाळांतील अनुसूचित

जमातीसाठी राखीव असलेली पदे भरली जात नाहीत. खाजगी शाळातील शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरती, बढती आणि आरक्षणाच्या संदर्भातील माहिती तसेच ज्या ज्या शैक्षणिक संस्थांनी आरक्षित पदे भरलेली नाहीत त्या शिक्षण संस्थाचे अनुदान का थांबविण्यात येऊ नये अशा प्रकारची नोटीस त्या त्या शैक्षणिक संस्थाना देण्यात आली आहे किंवा नाही याबाबतची माहिती समितीला देण्यात आलेली नाही. अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असलेल्या जागा न भरणाऱ्या शैक्षणिक संस्थांना मान्यता कशाच्या आधारे दिली जाते शिक्षकांची किती पदे रिक्त आहेत व पदोन्नतीची किती पदे रिक्त आहेत, अशी समितीने विचारणा केली असता शिक्षणाधिकारी यांनी माध्यमिक शिक्षकांची १३ पदे रिक्त आहेत. मुख्याध्यापक आणि केंद्र प्रमुखांचे प्रमोशन झालेले आहे. गणित, इंग्रजी, विज्ञान या विषयांच्या शिक्षकांचे प्रस्ताव निकाली काढण्यात येत आहेत. असे समितीला सांगितले. समितीने अनुसचित जमाती प्रवर्गातील प्राथमिक शिक्षण संवर्गात बी.एससी, बी.एड. विज्ञान, गणित, इंग्रजी या विषयाचे शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे सदरील पदे रिक्त आहेत, अशी माहिती पुस्तिकेमध्ये दिलेली आहे. तेव्हा रिक्त असलेल्या १३ माध्यमिक शिक्षकांच्या पदांवर सामान्य शिक्षकांची भरती करून त्यांना प्रशिक्षण द्यावे.

३.२ नियमानुसार अनुसूचित जमातीसाठी असलेल्या जागा भरल्या गेल्या पाहिजेत. काही शैक्षणिक संस्था वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अनुसूचित जमातीचे उमेदवार मिळत नाहीत असे सांगून त्या जागी खुल्या प्रवर्गातील लोकांची भरती करण्यात येते. तेव्हा बी.एस.सी.,बी.एड. झालेले शिक्षक मिळत नसतील तर खुल्या प्रवर्गाची पदे अनुसूचित जमातीसाठी ट्रान्स्फर करून ही पदे भरण्यात यावी तसेच अनुसूचित जमातीतील अप्रशिक्षित शिक्षक घेता येत असतील तर त्याप्रमाणे अप्रशिक्षित शिक्षक घेऊन अशा शिक्षकांना विषयासंबंधित प्रशिक्षण देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. पदोन्नतीची पदे भरत्यानंतर त्यांच्या जागी दुसऱ्या विषयाच्या शिक्षकांची भरती करा. याबाबतची कार्यवाही एक महिन्यात करण्यात यावी तसेच शिक्षकांची पदे भरताना स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरात द्यावी, असे बंधन घालावे. शालेय शिक्षण विभागाने शासन निर्णय काढून व्ही.जे.एन.टी. प्रवर्गातील १२ वी पास झालेल्या उमेदवारांची अप्रशिक्षित शिक्षक म्हणून नियुक्ती केली होती व नंतर त्यांना प्रशिक्षित केले होते. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी त्याप्रमाणे शासन निर्णयात तरतूद आहे काय, अनुसूचित जमातीचे उमेदवार मिळत नाही. म्हणून दुसऱ्या प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती केली जाते असे समितीचे ठाम मत असून त्याप्रमाणे कार्यवाही करावी, असे समितीने निदेश दिले.

३.३ दिनांक ११ फेब्रुवारी २०११ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी समितीने खाजगी शाळांमधील शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरती, बढती आणि आरक्षणाच्या संदर्भात माहिती विचारली असता शिक्षणाधिकारी यांनी " खाजगी शाळांमधील शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती, बढती करण्याचे अधिकार त्या त्या संस्थांना आहेत " असे समितीस सांगितले. अनुसूचित जमातीची

राखून ठेवण्यात आलेली पदे भरण्यात आलेली नसताना या संस्थांचे आतापर्यंत अनुदान का बंद करण्यात आले नाही. अशी समितीने विचारणा केली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी ज्या खाजगी संस्थांनी अनुशेष भरलेला नाही त्या सर्व संस्थांना समितीच्या बैठकीनंतर अनुशेष भरण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अनुशेष न भरण्यास अशा संस्थेचे अनुदान बंद करण्यात येईल असे संबंधित संस्थांना कळविण्यात आले आहे तसेच खाजगी संस्थांना अनुशेष भरण्यासाठी काही कालावधी देणे आवश्यक होते असे शिक्षणाधिकारी यांचे मत आहे असे समितीला सांगितले.

३.४ शासन निर्णयानुसार खाजगी संस्थांना भरती करण्याचे अधिकार आहेत. या संस्था शासनाच्या अनुदानावर चालतात. तेव्हा खाजगी संस्था असल्या तरी ते स्वतः मालक झाले असे होत नाही. या शाळांना मान्यता शासनाकडून घ्यावी लागते खाजगी संस्थांना कोणतेही काम करावयाचे असेल तर त्या संदर्भातील नस्ती शिक्षण विभागाकडे पाठवावी लागते असे समितीने मत व्यक्त केले असता मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद यांनी खाजगी संस्थांनी अनुशेष भरला नाही तर त्यांचे अनुदान बंद करण्यात येईल असे पत्र संस्थांना दिलेले आहे. काही संस्थांनी अनुशेष भरला नाही असे लक्षात आल्यावर त्यांचे अनुदान फेब्रुवारी, २०११ या महिन्यापासून देऊ नये अशाप्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत आणि तसे खाजगी संस्थांना कळविण्यात आलेले आहे. ज्या खाजगी संस्थांनी आरक्षणाची पदे भरली नाहीत त्या संस्थांचे अनुदान थांबवावे असा सामान्य प्रशासन विभागाचा दिनांक ५ नोव्हेंबर २००९ रोजीचा शासन निर्णय आहे, असे समितीला सांगितले. समितीने साक्ष लावली नसती तर आपण ही कार्यवाही फेब्रुवारी महिन्यातदेखील केली नसती, असे समितीने मत व्यक्त केले. तसेच बीड जिल्ह्यातील पदे भरावयाची असतील तर त्या पदांची जाहिरात नांदेड, जालना, औरंगाबाद या जिल्ह्यातील वर्तमानपत्रात दिली जाते. नंतर असे सांगण्यात येते की, आम्हाला उमेदवार मिळत नाहीत म्हणून अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या जागेवर अन्य संवर्गातील उमेदवाराची नियुक्ती करावी लागली. बीड जिल्ह्यात बी.एड. आणि डी.एड. केलेले जवळपास दोन हजार अनुसूचित जमातीचे उमेदवार आहेत. त्यांना अद्यापपर्यंत नोकरी मिळालेली नाही. त्यामुळे बीड जिल्ह्यात अनुसूचित जमातीचे उमेदवार उपलब्ध होत नाहीत असे म्हणता येणार नाही. अनुसूचित जमातीचे उमेदवार ज्या पदांवर उपलब्ध होऊ शकणार नाहीत अशी पदे अनुसूचित जमातीसाठी राखीव असतात. म्हणजे अनुसूचित जमातीचे उमेदवार मिळत नाहीत म्हणून त्या जागेवर अन्य संवर्गातील उमेदवाराची निवड करावी लागत आहे असे संबंधित संस्थांकडून सांगण्यात येते.

३.५ बीड जिल्ह्यामध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील प्राथमिक शिक्षकांच्या एकूण किती जागा रिक्त आहेत अशी समितीने विचारणा केली त्यावर शिक्षणाधिकारी यांनी अनुसूचित जमाती-प्रवर्गातील शिक्षकांच्या १६५, लिपिकांच्या १६, सेवकांच्या २९ आणि मुख्याध्यापकांच्या ६ व इतर संवर्गातील जागा रिक्त आहेत, असे समितीला सांगितले. बीड जिल्हा परिषद कार्यालयातील प्राथमिक शिक्षण विभागात

(अनुदानित संस्थांसह) २६६ पदांचा अनुशेष आहे. मुख्याध्यापकांचे १ पद रिक्त आहे. आष्टी तालुक्यातील लोकमान्य शिक्षण संस्थेमध्ये अनुसूचित जमातीचा अनुशेष शिल्लक असतानासुद्धा रिक्त पदे शून्य असल्याचे नमूद केलेले आहे. अनुदानित शाळेवर अनुसूचित जमातीचे उमेदवार भरण्यात आल्याचे दाखविण्यात येतात आणि कायम विनाअनुदानाची परवानगी घेतात. अनुसूचित जमाती, अनुसूचित जातीचे उमेदवार कायम विनाअनुदानित शिक्षणसंस्थेमध्ये दाखवून अनुसूचित जमाती, अनुसूचित जातीच्या जागेवर संस्था चालकांच्या नातेवाईकांचे पगार काढले जातात. कायम विना अनुदानावर अनुसूचित जमाती, अनुसूचित जातीचे उमेदवार नकोत. याप्रकरणी एकत्रितपणे मान्यता न देता स्वतंत्रपणे मान्यता दिली पाहिजे. अनुदानित शाळेतील अनुसूचित जमाती, अनुसूचित जातीची सर्व पदे भरलेली आहेत किंवा नाहीत हे बघण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी यांची आहे. खाजगी माध्यमिक शाळेतील एकूण शिक्षकांची संख्या २९०२ इतकी असताना ज्या शिक्षण संस्थेमध्ये अनुसूचित जमातीच्या पदांचा अनुशेष आहे अशा ४८ शिक्षण संस्थांची यादी समितीला दिलेली आहे. **(परिशिष्ट "अ" पहावे)** त्या शिक्षण संस्थामध्ये अनुसूचित जमातीचा एकूण अनुशेष २३४ आहे. जोपर्यंत अनुसूचित जमातीच्या पदांचा अनुशेष या संस्थेकडून भरला जात नाही तोपर्यंत या संस्थांचे अनुदान थांबवावे असे समितीने निदेश दिले.

**३.६** बीड जिल्ह्यात एका संस्थेची एकच शाळा असणाऱ्या संस्थांची संख्या ६६ असून तेथे अनुसूचित जमातीची एकूण २७ पदे रिक्त आहेत. **(परिशिष्ट "ब" पहावे)** तसेच एका संस्थेच्या एकापेक्षा जास्त शाळा असणाऱ्या संस्थांची संख्या १५ असून तेथे अनुसूचित जमातीची एकूण २० पदे रिक्त आहेत. **(परिशिष्ट "क" पहावे)** त्यामध्ये भारतीय शिक्षण प्रसारक मंडळ, अंबाजोगाई प्रा.शा.बीड या संस्थेच्या एकूण तीन शाळा असून त्याठिकाणी अनुसूचित जमातीच्या ३ जागा रिक्त आहेत. ६६ संस्थांमध्ये रिक्त असलेली २७ पदे आणि १५ संस्थांमध्ये रिक्त असलेली २० पदे अशी एकूण ४७ पदे जोपर्यंत भरली जात नाहीत, तोपर्यंत संबंधित संस्थांचे अनुदान थांबविण्यात यावे. तसेच रिक्त पदे भरण्यासाठी वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात देण्यात यावी, असे संबंधित संस्थांना कळविण्यात यावे, असे समितीने निदेश दिले.

**अभिप्राय व शिफारशी :**

**३.७ बीड जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खाजगी शिक्षण संस्थांमध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील कर्मचाऱ्यांची संख्या जास्त प्रमाणात आहे. खाजगी संस्थांमधील कर्मचाऱ्यांचा अनुशेष तपासण्याची जबाबदारी ही जिल्हा परिषदेची आहे. खाजगी शाळांवर शिक्षणाधिकाऱ्यांचे कोणतेही नियंत्रण नसून अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली पदे भरली जात नाहीत असे समितीच्या निदर्शनास आले आहे. नियमानुसार अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असलेली पदे भरली जात नाहीत. तोपर्यंत अशा शैक्षणिक संस्थांना मान्यता देण्यात येऊ नये. अनुसूचित जमाती प्रवर्गातील प्राथमिक शिक्षण संवर्गात बी.एस.सी., बी.एड., विज्ञान, गणित, इंग्रजी या विषयाचे शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे**

माध्यमिक शिक्षकांची १३ पदे रिक्त आहेत. काही शैक्षणिक संस्था वर्तमानपत्रात जाहिरात दिल्यानंतर अनुसूचित जमातीचे उमेदवार मिळत नाहीत असे कारण दर्शवून त्याठिकाणी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची भरती करतात. त्यामुळे योग्य शैक्षणिक पात्रता असलेले शिक्षक उपलब्ध होत नसल्यास खुल्या प्रवर्गाची पदे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी ट्रान्सफर करून माध्यमिक शिक्षकांची रिक्त असलेली १३ पदे त्वरित भरण्यात यावी तसेच अनुसूचित जमातीतील अप्रशिक्षित शिक्षक घेऊन अशा शिक्षकांना विषयासंबंधित प्रशिक्षण देण्याबाबतची कार्यवाही केल्यास अनुसूचित जमातीचे शिक्षक प्रशिक्षण घेऊन उपलब्ध करून देता येतील. त्यादृष्टीने जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

३.८ राज्यातील जिल्हापरिषद व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत व आदिवासी उप योजना क्षेत्राबाहेरील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांवर अनुसूचित जमातीच्या अप्रशिक्षीत शिक्षकांची नियुक्ती करण्यात येते. या तीन वर्षांच्या कालावधीत त्यांनी आपले प्रशिक्षण पूर्ण करावे असा शासन निर्णय आहे. अशा कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण होण्यासाठी संबंधित शाळेतील शिक्षकही प्रयत्नशील असतात. परंतु अप्रशिक्षीत शिक्षकांना शाळेत पुन्हा प्रवेश न मिळाल्यामुळे ते शिक्षण सेवकाच्या कालावधीत त्यांचे प्रशिक्षण पूर्ण करू शकत नाहीत. अशा शिक्षक सेवकांना पुन्हा शाळेत नियुक्ती मिळाल्यास त्यांची शिक्षक सेवक म्हणून नियुक्ती न करता त्यांना अप्रशिक्षीत श्रेणीवर (प्रशिक्षण पूर्ण होईपर्यंत) नियुक्ती देण्याबाबत शिक्षण विभागाकडून कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

३.९ बीड जिल्हापरिषद कार्यालयातील शिक्षण विभागात अनुसूचित जमाती प्रवर्गातील (अनुदानित संस्थांसह) २३४ पदांचा अनुशेष आहे. खाजगी शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती, बढती करण्याचे अधिकार त्या-त्या संस्थांना आहेत. ज्या खाजगी संस्थांनी अनुशेष भरलेला नाही त्या संस्थांना अनुशेष भरण्याबाबत व अनुशेष न भरल्यास त्या संस्थेचे अनुदान बंद करण्यात येईल असेही शैक्षणिक संस्थांना कळविण्यात आले होते. तथापि, साक्षीच्या बैठकीपर्यंत या संस्थांनी अनुशेष भरलेला नाही. म्हणजेच अशा खाजगी शैक्षणिक संस्थांना शिक्षण विभागाकडून पाठीशी घालण्याचा हा प्रयत्न आहे. शासन निर्णयानुसार खाजगी संस्थांना भरती करण्याचे अधिकार असले तरी, या शाळांना प्रथम मान्यता शासनाकडून घेणे आवश्यक आहे. खाजगी शैक्षणिक संस्थांनी अनुशेष भरलेला नसल्यास अशा संस्थांचे अनुदान बंद करणेबाबत दिनांक ५ नोव्हेंबर २००९ रोजीचा शासन निर्णय आहे, त्यानुसार त्वरित कारवाई होणे समितीस अभिप्रेत आहे. ज्या संस्थांनी अनुशेष भरलेला नाही, अशा संस्थांचे अनुदान फेब्रुवारी २०११ पासून बंद करण्यात आले आहे अशा सूचना खाजगी संस्थांना दिलेल्या आहेत. समितीने साक्ष लावली नसली तर जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून ही कार्यवाही

करण्यात आली नसती. जिल्हापरिषद कार्यालयास भेट देऊन ८-९ महिन्यांचा कालावधी उलटून गेलेला आहे. त्यानंतर खाजगी शैक्षणिक संस्थांनी अनुशेष न भरल्यामुळे संस्थांचे अनुदान बंद करण्यात येत आहे. अशा प्रकारच्या सूचना देण्यास शिक्षण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्याकडून विलंब झालेला आहे. ज्या अधिकाऱ्यांकडून विलंब करण्यात आला आहे. अशा संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

३.१० खाजगी माध्यमिक शाळेतील ४८ शिक्षण संस्थांमध्ये अनुसूचित जमातीच्या एकूण २३४ पदांचा अनुशेष आहे हा अनुशेष त्वरित भरून काढण्याबाबत संबंधित संस्थांना सूचना दिलेल्या आहेत. तसेच जिल्हापरिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात २६६ पदांचा अनुशेष रिक्त असताना पदे शुन्य आहेत. त्यानुसार जोपर्यंत अनुसूचित जमातीच्या पदांचा शिल्लक अनुशेष या संस्थांकडून भरला जात नाही तोपर्यंत या संस्थांचे अनुदान वितरित करण्यात येऊ नये, अशी समितीची शिफारस आहे.

(४) अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांचे जातवैधता प्रमाणपत्र व रिक्त पदे :-

४.१ जिल्हा परिषद, बीड या कार्यालयातील विविध विभागामध्ये तांत्रिक/अतांत्रिक स्वरुपाची वर्ग १ ते ४ मध्ये एकूण किती पदे मंजूर आहेत मंजूर पदांपैकी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी किती पदे राखीव ठेवण्यात आली त्यापैकी किती पदे भरण्यात आली व किती पदे रिक्त आहेत याबाबत बैठकीच्या वेळी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद कार्यालयातील विविध विभागात कार्यरत असलेल्या एकूण सरळसेवा व पदोन्नतीद्वारे भरण्यात आलेल्या व रिक्त असलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

सरळसेवा

| विभाग | मंजूर पद | अनु. जमातीसाठी राखीव पदे | प्रत्यक्षात भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| (१) सामान्य प्रशासन विभाग | १२९९ | ९० | ८६ | ४ |
| (२) आरोग्य विभाग | ५४३ | २८ | २८ | ० |
| (३) कृषि विभाग | १५ | २ | १ | १ |
| (४) पशुसंवर्धन विभाग | १०० | ७ | ७ | ० |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| (५) बांधकाम विभाग | १७१ | ११ | ४ | ७ |
| (६) शिक्षण विभाग | ८२११ | ५७६ | ५७१ | ५ |
| (७) वित्त विभाग | ४६ | ४ | ४ | ० |
| (८) पंचायत विभाग जिल्हा परिषद | ६१२ | ४३ | ३५ | ८ |
| (९) बाल कल्याण विभाग | ७४ | ६ | ५ | १ |
| | ११०७१ | ७६७ | ७४१ | २६ |

४.२ बांधकाम विभागांतर्गत स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यामध्ये शा.नि.दि. २० मे १९९९ अनुसार तांत्रिक सहाय्यक, मिस्त्री ग्रेड-१, २, रोड कारकून, मस्टर क्लार्क, समयपाल व अनुरेखक या संवर्गाचे सुसूत्रीकरण करून त्याऐवजी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हा एकच संवर्ग निर्माण केलेला आहे. सदर पद हे उपरोक्त संवर्गातून पात्रता व ज्येष्ठतेप्रमाणे समायोजनाने भरणेबाबत कळविले असून या संवर्गातील सर्व पात्र कर्मचाऱ्यांचे समायोजन झाल्यानंतर बिंदुनामावली तयार करणेबाबत कळविलेले आहे.

पदोन्नतीने

| विभाग | मंजूर पदे | अनु. जमातीसाठी राखीव पदे | प्रत्यक्षात भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| (१) सामान्य प्रशासन विभाग | ३३८ | २३ | २३ | ० |
| (२) आरोग्य विभाग | ९३ | ६ | ० | ६ |
| (३) कृषि विभाग | २५ | २ | २ | ० |
| (४) पशुसंवर्धन विभाग | ७४ | ६ | ३ | ३ |
| (५) बांधकाम विभाग | ८६ | ७ | ४ | ३ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| (६) शिक्षण विभाग | ९५८ | ६८ | ४८ | २० |
| (७) वित्त विभाग | ५१ | ३ | १ | २ |
| (८) पंचायत विभाग जिल्हा परिषद | १२१ | ९ | ६ | ३ |
| | १७४६ | १२४ | ८७ | ३७ |

४.३ समितीने सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद या विभागात अनुसूचित जमातीची किती पदे भरण्यात आली व किती पदे रिक्त आहेत अशी विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी, वर्ग-१ व २ ची पदे शासनाच्या पातळीवर भरली जातात. वर्ग-३ व ४ ची पदे जिल्हा निवड समितीमार्फत भरली जातात. वरिष्ठ सहायक या संवर्गाची एकूण ३२ पदे मंजूर असून त्यातील २ पदे अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत व ती सरळ सेवेने भरलेली आहेत. त्यानंतर वरिष्ठ सहायक स्पर्धापरीक्षा या संवर्गाची सुद्धा ३२ मंजूर पदे असून त्यापैकी दोन पदे अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत परंतु, अनुसूचित जमातीचे उमेदवार उत्तीर्ण न झाल्यामुळे ती पदे रिक्त आहेत. ही स्पर्धा परीक्षा विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत घेतली जाते. कनिष्ठ सहायकाची २७२ पदे असून त्यापैकी १९ पदे अनुसूचित जमातीच्या प्रवर्गासाठी राखीव आहेत व त्यातील १७ पदे प्रत्यक्षात भरण्यात आली, २ पदे रिक्त आहेत. त्यापैकी एका उमेदवाराची निवड केलेली आहे. परंतु, अद्याप जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यामुळे नियुक्ती बाकी आहे. प्रमाणपत्र मिळाल्यानंतर लवकरच नियुक्ती करण्यात येईल. यानंतर विस्तार अधिकारी (सांख्यिकी) एकूण २४ पदे मंजूर असून त्यात २ पदांचा अनुशेष अनुसूचित जमातीसाठी असून ही दोन्ही पदे भरलेली आहेत. लघुलेखक उच्च श्रेणी हे एक पद मंजूर आहे त्यामुळे तेथे आरक्षणाचा प्रश्न येत नाही. लघुलेखन निम्नश्रेणी हे सुध्दा एकच पद असल्याने त्यालाही आरक्षण नाही असे समितीला सांगितले.

४.४ सन १९९५ पूर्वीची व १९९५ नंतरची कनिष्ठ सहायकाची किती पदे आहेत. त्याचप्रमाणे पदोन्नतीने अनुसूचित जमातीचे किती उमेदवार भरण्यात आलेले आहेत. पदोन्नती देण्यापूर्वी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र तपासले होते काय ? तसेच सन १९९५ पूर्वी अनुसूचित जमाती प्रवर्गात नसलेले आणि आदिवासी समाजाचे आहे असे समजून संरक्षण दिलेले किती पदे आहेत. कनिष्ठ सहायकाच्या एकूण २७२ जागांमध्ये सन १९९५ पूर्वीचे आणि नंतरचे किती पदे आहेत. सन १९९५ नंतर नियुक्ती दिलेल्या किती लोकांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे. तसेच दोन जागांवर आंतर जिल्हा बदलीने दुसऱ्या जिल्ह्यातील कार्यालयाची भरती करणार आहात, तेव्हा याबाबत आंतर जिल्हा बदली करता येते काय ? अशी समितीने पृच्छा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य

प्रशासन) यांनी सन १९९५ पूर्वीचा एक कर्मचारी असून सन १९९५ नंतरचे १८ कर्मचारी आहेत. ग्रामविकास विभागाने मागील वर्षापासून असे कळविले आहे की, दरवर्षी रिक्त जागा भरावयास पाहिजेत. त्या अनुषंगाने त्या त्या प्रवर्गाची पदे भरण्यासाठी आंतर जिल्हा बदलीचे प्रस्ताव अगोदरच दिलेले आहेत. परंतु, त्यांनी अद्याप त्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना सोडलेले नाही असे समितीला सांगितले. आंतर जिल्हा बदलीने सामावून घेण्यासाठी हे पद राखीव ठेवले आहे. याचा अर्थ आपण संमती दिली आहे म्हणून एक महिन्यात जर या लोकांना सोडले नाही तर ही पदे भरण्यात येतील असे त्यांना कळवावे असे समितीचे निर्देश आहे.

४.५ जिल्हा परिषद कार्यालयातील विविध संवर्गात भरण्यात आलेली व अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात आलेली विभागनिहाय एकूण ७४१ पदांपैकी सन १९९५ पूर्वीची किती व सन १९९५ नंतरची किती पदे आहेत या कर्मचाऱ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्र संबंधीचा प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे केव्हा सादर करण्यात आला आहे. उमेदवारांने नोकरीवर लागल्यानंतर किती कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करायला पाहिजे अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) यांनी वैधता प्रमाणपत्र सहा महिन्यांच्या कालावधीत सादर करायला पाहिजे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दिनांक ३१ डिसेंबर २००७ पर्यंत मुदतवाढ दिलेली असून जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांना वारंवार सूचना आणि नोटिसा दिलेल्या आहेत, असे समितीला सांगितले. समितीने जिल्हा परिषद कार्यालयातील विविध विभागात कार्यरत असलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी सरळ सेवाद्वारे भरण्यात आलेल्या पदामध्ये सामान्य प्रशासन विभाग-८६, आरोग्य विभाग-२८, कृषी-१, पशुसंवर्धन-७, बांधकाम-४, शिक्षण-५७१, वित्त-४, पंचायत विभाग-३५, बालकल्याण विभाग-५ अशी एकूण ७४१ पदे भरण्यात आलेली आहे. तसेच पदोन्नतीद्वारे भरण्यात आलेल्या पदांमध्ये समान्य प्रशासन विभाग-२३, कृषी-२, पशुसंवर्धन-३, बांधकाम-४, शिक्षण विभाग-४८, वित्त-१, पंचायत विभाग-६ अशी एकूण ८७ पदे भरण्यात आलेली असून पदोन्नतीद्वारे भरावयाची एकूण ३७ पदे रिक्त आहे.

४.६ वरीलप्रमाणे सरळसेवा व पदोन्नतीद्वारे भरण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांपैकी सन १९९५ पूर्वीची किती व १९९५ नंतरची किती पदे भरण्यात आलेली आहे व ज्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर केलेले नाहीत असे लोक बोगस आदिवासी असल्यामुळे खऱ्या आदिवासींवर अन्याय झालेला आहे. बोगस आदिवासी लोक नियमबाह्यपद्धतीने सेवेत लागून शासनाचा पगार घेत आहेत. याबाबतीत कोण जबाबदार आहे. सन १९९५ नंतर नियुक्त झालेल्या ज्या लोकांनी प्रस्ताव सादर केले नाहीत त्यांच्यावर यापूर्वीच कारवाई व्हायला पाहिजे होती. ही कारवाई करण्यास ज्यांनी चालढकल केली त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे, ज्यांना शासनाने संरक्षण दिलेले आहे त्यांची जात वैधता तपासणी करू नये असे म्हटलेले नाही. जोपर्यंत जात वैधता

प्रमाणपत्र सादर केले जात नाही तोपर्यंत त्या कर्मचाऱ्याला दुसऱ्या संवर्गात बदली करता येत नाही. १९९५ नंतर सेवेत लागलेल्या लोकांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठीचे प्रस्ताव का सादर केले नाहीत. आदिवासी लोकांसाठी आरक्षित असलेल्या पदावर १९९५ नंतर बिगर आदिवासी लोकांची नियुक्ती करून त्यांना वाचविण्याचा ज्या ज्या अधिकाऱ्यांनी प्रयत्न केलेला आहे त्या सर्व अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याची आवश्यकता आहे. जात वैधता प्रमाण पत्रासाठी प्रस्ताव सादर करणेबाबत वारंवार सूचना आणि नोटिसा देऊनही ज्यांनी प्रस्ताव सादर केले नाहीत. त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करून त्यांना निलंबित करता आले असते. ज्या अधिकाऱ्यांनी चुकीच्या पद्धतीने कार्यवाही केली त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, असे समितीचे निदेश आहे.

४.७ जिल्हा परिषदेने प्रस्ताव पाठविल्यानंतर जात पडताळणी समितीकडे किती प्रस्ताव प्रलंबित आहेत याबाबत जात पडताळणी समितीच्या अधिकाऱ्यांबरोबर बसून माहिती घ्यावी. ज्यांचे प्रस्ताव दाखल झालेले नाहीत आणि ज्यांना सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ झालेला आहे त्यांना सेवेतून काढून टाकण्यात यावे, असे समितीने निर्देश दिले असता मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी ज्या कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव सादर केलेले नाहीत किंवा त्यांची जात वैधता प्रमाणपत्रे आलेली नाहीत असे कर्मचारी आणि काही कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव सादर केलेले आहेत. परंतु वैधता प्रमाणपत्र आलेले नाहीत. अशा सर्व कर्मचाऱ्यांना नोटीस दिलेली आहे. काही कर्मचाऱ्यांचे असे म्हणणे आहे की, विभागीय जात पडताळणी समितीकडे मोठ्या प्रमाणावर प्रकरणे प्रलंबित आहेत त्यामुळे त्यांनी थोडा वेळ वाढवून मागितलेला आहे. त्यांना थोडा कालावधी वाढवून दिलेला आहे. त्या कालावधीत जर ते जात वैधता प्रमाणपत्र देऊ शकले नाहीत तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. ज्यांनी प्रस्ताव सादर केलेले नाहीत त्यांच्या बाबतीत लगेच कारवाई करण्यात येईल. परंतु, ज्यांचे प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत त्यांनी थोडा वेळ वाढवून मागितलेला असल्यामुळे जोपर्यंत त्याचे जात वैधता प्रमाणपत्र येत नाही तोपर्यंत त्यांना सेवेतून कमी करून नये, असे समितीला सांगितले.

४.८ दिनांक ११ फेब्रुवारी २०११ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्यावेळी समितीला जिल्हा परिषद कार्यालयातील विविध विभागात कार्यरत असलेल्या एकूण अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांपैकी सन १९९५ पूर्वीचे व १९९५ नंतरचे किती कर्मचारी आहेत, जात प्रमाणपत्र सादर केलेले व सादर न केलेले किती कर्मचारी, जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केलेले व प्रस्ताव सादर न केलेले किती कर्मचारी आहेत, याबाबतची माहिती लेखी स्वरूपात समितीला सादर करण्यात आली. दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने साक्षीच्या वेळी सचिव, ग्रामविकास विभाग यांनी असे सांगितले की, जिल्हा परिषदेत सर्व विभाग मिळून ज्यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले नाही असे एकूण ३२१ कर्मचारी आहेत. त्या ३२१ कर्मचाऱ्यांना जात वैधता प्रमाणपत्र दिले

नाही म्हणून अशा कर्मचाऱ्यांच्या बडतर्फीचे आदेश दिनांक १४ मे २०१० ला काढण्यात आले. त्यानंतर कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आल्याबाबत दिनांक १९ मे २०१० ला जिल्हा परिषद कार्यालयात समितीची सभा झाली, त्यामध्ये काही कर्मचारी जात वैधता प्रमाणपत्र देऊ शकतील म्हणून मुदत देण्यात यावी, असे ठरले. त्याप्रमाणे १६८ कर्मचाऱ्यांनी वैधता प्रमाणपत्र कार्यालयास सादर केले, त्यामुळे त्यांचे बडतर्फीचे आदेश रद्द करण्यात आले. उर्वरित १२५ कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे पाठविले आहेत. समितीकडून निर्णय येईपर्यंत कोणतीही कार्यवाही करता येणार नाही. १८ कर्मचाऱ्यांनी राजिनामे दिले आहेत. आता जे १० कर्मचारी आहेत, त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र दिले नव्हते, त्यापैकी ५ जण सन १९९५ पूर्वीचे होते, त्यामुळे त्यांना संरक्षण दिले आहे व उर्वरित ५ जणांना कायमस्वरूपी बडतर्फी केले आहे, अशी ३२१ ची विगतवारी आहे.

४.९ समितीने दिनांक १९ मे २०१० व १४ जुलै २०१० रोजीच्या पत्रान्वये दोन-दोन महिन्यांचे स्थगितीचे आदेश दिल्यामुळे बडतर्फ करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यानंतर मात्र जात वैधता प्रमाणपत्र आणून दिले किंवा जात प्रमाणपत्र पडताळणीसाठीच्या प्रस्तावासाठी कागदपत्रे आणून दिली. त्यामुळे सर्व कागदपत्रे जात पडताळणी समितीला सादर केली आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी समितीला सांगितले. सामान्य प्रशासन विभागाबद्दल दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने सन १९९५ नंतरचे ४९ कर्मचारी आहेत, विहित कालावधीत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर न केलेले कर्मचारी ५१ आहेत, असे दिले आहे. सन १९९५ नंतरच्या ४९ कर्मचाऱ्यांनी विहित कालावधीत म्हणजे नेमणुकीपासून ६ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे त्यासाठी समितीच्या आदेशाची वाट पाहण्याची काही गरज नाही.

४.१० जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या सर्व विभागातील संवर्ग निहाय अनुसुचित जमातीच्या असलेल्या उमेदवारांची संख्या सन १९९५ पूर्वी १५४ व सन १९९५ नंतर २८० इतकी आहे. त्यापैकी विहित कालावधीत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केलेले कर्मचारी २५९ व जात प्रमाणपत्र सादर न केलेले कर्मचारी ८३ इतके आहेत व १५३ कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे तपासणीसाठी सादर केले आहे व २० कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव सादर करणे बाकी आहे, अशी लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली. **(परिशिष्ट " ड " पहावे)** सन २००९ चे शासन आदेश स्पष्ट आहेत की, उमेदवार जोपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करत नाही, तोपर्यंत नियुक्ती द्यावयाची नाही. सन २००९ नंतर ही पॉलिसी नव्याने झाली आहे समितीने जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही तरी ह्या लोकांना आपण इतक्या दिवसांपासून सेवेत कसे ठेवले आहे. शासन निर्णयानुसार ६ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे क्रमप्राप्त आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी १२५ जणांनी जात प्रमाणपत्र पडताळणीचे प्रस्ताव सादर केले असून ते समितीकडे गेले आहेत. आता समितीकडून किती दिवसांत उत्तर यावे याचे बंधन नाही. आता त्या संदर्भात त्यांच्याकडून उत्तर आल्याशिवाय त्यांना सेवेतून काढता येणार नाही. तसेच उक्त १२५ कर्मचाऱ्यांपैकी ८२ कर्मचारी कोर्टात गेलेले असून कोर्टाने दिलेल्या स्टेची मुदत काही कर्मचाऱ्यांच्या बाबतीत ३ महिने, ६ महिने, १ वर्षे तर काही कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी स्थगिती दिली आहे, असे समितीला सांगितले.

४.११ समितीने ३२१ जणांना बडतर्फ केले असता जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबत समितीने २-२ महिन्याच्या दोन वेळी संधी उपलब्ध करून दिली आहे. २ महिन्यांमध्ये जात वैधता प्रमाणपत्र देण्याकरिता उमेदवारांनी पुढाकार घ्यायला पाहिजे होता, असे समितीचे मत आहे. यामध्ये काही कर्मचारी सन १९९५ पूर्वीचे व काही कर्मचारी सन १९९५ नंतरचे आहेत. सन १९९५ पूर्वीच्या कर्मचाऱ्यांना सेवेत संरक्षण दिले आहे. काही कर्मचारी सन १९९५ पूर्वीचे असले तरी ते नेमके कोणत्या जातीचे आहेत, आदिवासी आहेत किंवा नाही हे पाहण्याचे आदेश समितीने दिले होते. सन १९९५ पूर्वीच्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली असेल, तर याप्रकरणी पुन्हा तपासणी करून त्यांना अगोदरच्या जागेवर घेतले पाहिजे, असे समितीचे मत आहे. सचिव, ग्रामविकास विकास विभाग यांनी विहित कालावधीत जात पडताळणी प्रमाणपत्र प्रस्ताव सादर न केलेल्या ४ कर्मचाऱ्यांना सेवेतून कमी केले आहे आणि ५ जणांना स्मरणपत्रे पाठविली आहेत. सदर माहिती फक्त जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाची आहे, असे समितीला सांगितले. उर्वरित १२५ पैकी ८२ लोक कोर्टात गेले. कोर्टाने त्यांच्या आदेशावर जात पडताळणी समितीचा निकाल लागेपर्यंत स्थगिती आदेश दिले. कोर्टात गेलेले आदिवासी हे बोगस आहेत, हे स्पष्ट कळते. कोर्टाने जात पडताळणी समितीकडे या प्रस्तावाचा निर्णय सोपविल्यानंतर समितीचा निर्णय येईपर्यंत कोर्ट अंतिम निर्णय देणार नाही. हे आदिवासी एकदम कोर्टात जातात टप्प्याटप्प्याने जाऊन जगलरी करतात. अशा प्रकारे खऱ्या आदिवासी उमेदवारावर अन्याय होऊन हा बोगस आदिवासी सेवानिवृत्त होईपर्यंत सर्व पदोन्नत्यांचा लाभ घेतो.

४.१२ प्रधान सचिव, आदिवासी विकास यांना समितीच्या माध्यमातून अशी विनंती करण्यात येत आहे की, यासंदर्भात एक विशेष असा जी.आर. काढावा किंवा कठोर सूचना सर्व जिल्ह्यांमध्ये जारी कराव्यात की, जात पडताळणी समितीने विहित मुदतीत जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र देणेबाबतचा निकाल लावण्यात यावा. तसेच, जात पडताळणी समितीचा निकाल लागल्यानंतर संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध ताबडतोब योग्य ती कारवाई करण्यात यावी. तसेच शासनाने जात पडताळणी समितीच्या निकालासंदर्भात व त्यावरून केल्या जाणाऱ्या योग्य कारवाईबाबत शासन निर्णय काढून तो काटेकोरपणे लागू करण्याचा निर्णय घेण्यात यावा. अन्यथा जात पडताळणी समितीकडे प्रमाणपत्राकरिता प्रस्ताव सादर केल्यानंतर कोर्टात गेल्यावर त्यावर स्टे मिळतो आणि मग समितीचा निर्णय लागेपर्यंत बोगस उमेदवार सर्व सोयीसुविधांचा लाभ घेतो. शासनाने कोर्टामध्ये अशा प्रकारचा एक कॅवेट दाखल केला पाहिजे की, कोर्टामध्ये जात पडताळणीबाबतच्या याचिका दाखल झाल्यास त्यावर अंतिम निर्णय घेताना कोर्टाने शासनाचे मत जाणून घ्यावे. तसेच सन १९९५ नंतरचे जे कर्मचारी नोकरीस लागलेले आहेत. त्यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशा प्रकारच्या कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करावी याबाबत आपण निश्चित एक शासन निर्णय काढून सर्व विभागांना अशा प्रकारचे पत्र देणे आवश्यक आहे. जात पडताळणी संशोधन समितीला सांगितले

पाहिजे की, विहित मुदतीत जात पडताळणी समितीचे काम झाले पाहिजे. पुणे येथील जात पडताळणी समितीमुळे तेथे काही लोकांनी आपल्या जातीसंबंधी हौतात्म्य पत्करलेले आहे. ठाकर समाजाच्या लोकांना प्रमाणपत्र देणे या ना त्या कारणावरून किंवा बोली भाषेवरून देणे टाळून बंदच केलेले आहे. पुणे येथील एका एस.टी.समाजाच्या एम.बी.बी.एस.व पी.एच.डी. झालेल्या मुलीने जात पडताळणी प्रमाणपत्र न दिले गेल्यामुळे त्या मुलीने प्रधान सचिवांकडे दाद मागितली. प्रधान सचिव आदिवासी विकास विभाग यांच्याकडे न्याय मागितल्यामुळे आपले प्रमाणपत्र इनव्हॅलिड ठरवित आहोत, असेही उदाहरण घडलेले आहे. आपण या मुलीच्या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करावी असा शेरा दिला होता, तरीही या मुलीचे जात वैधता प्रमाणपत्र नाकारण्यात आले आहे, त्यामुळे जात पडताळणी समितीचे सदस्य हे जात पडताळणी प्रमाणपत्र देणारे वतनदार बनलेले आहेत असे समितीने मत व्यक्त केले.

अभिप्राय व शिफारशी :—

४.१३ जिल्हा परिषद, बीड या कार्यालयातील विविध विभागात सरळ सेवा व पदोन्नतीद्वारे भरण्यात आलेल्या एकूण मंजूर पदांपैकी विभागनिहाय अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या सरळसेवाद्वारे भरण्यात आलेल्या एकूण ७४१ व पदोन्नतीद्वारे भरण्यात आलेल्या एकूण १२४ पैकी सन १९९५ पूर्वी व १९९५ नंतर भरण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी वारंवार सूचना व नोटिसा देऊन संबंधित कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयात सादर केले नाही. ज्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्राचे प्रस्ताव सादर केलेले नाहीत असे कर्मचारी बोगस आदिवासी असल्यामुळे खऱ्या आदिवासी लोकांवर अन्याय झालेला आहे. सन १९९५ नंतर नियुक्ती करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांनी नियुक्तीनंतर सहा महिन्यांच्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतु, ज्या कर्मचाऱ्यांनी अद्यापपर्यंत प्रस्ताव सादर केले नाही त्यांच्यावर कारवाई झालेली दिसून येत नाही. आदिवासी लोकांसाठी आरक्षित असलेल्या पदावर बिगर आदिवासी लोकांची नियुक्ती करून त्यांना वाचविण्याचा ज्या अधिकाऱ्यांनी प्रयत्न केलेला आहे अशा संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी तसेच ज्या कर्मचाऱ्यांना जात वैधता प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर करणेबाबत वारंवार सूचना व नोटिसा देऊनही ज्यांनी अद्यापपर्यंत प्रस्ताव सादर केले नाहीत अशाही कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करूनकेलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

४.१४ जिल्हा परिषद कार्यालयात कार्यरत असलेल्या विभागनिहाय ज्या अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशा एकूण ३२१ कर्मचाऱ्यांना जात वैधता प्रमाणपत्रा अभावी त्यांच्या विरुध्द दिनांक १४ मे २०१० ला बडतर्फीचे आदेश काढण्यात आले होते. तथापि, त्यानंतर बडतर्फ करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांपैकी १६८ कर्मचाऱ्यांनी जात

वैधता प्रमाणपत्र कार्यालयास सादर केलेले असल्याने या कर्मचाऱ्यांचे बडतर्फीचे आदेश रद्द करण्यात आले. उर्वरित १२५ कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे पाठविले आहे. समितीकडून निर्णय येईपर्यंत कोणतीही कार्यवाही करता येत नाही १८ कर्मचाऱ्यांनी राजिनामे दिले, १० कर्मचाऱ्यांपैकी ५ कर्मचारी सन १९९५ पूर्वीचे असल्याने त्यांना संरक्षण दिले व ५ कर्मचाऱ्यांना कायम स्वरूपी बडतर्फ केले आहे. तसेच उक्त १२५ कर्मचाऱ्यांपैकी ८२ कर्मचारी कोर्टात गेलेले असून न्यायालयाने दिलेली स्थगितीची मुदत काही कर्मचाऱ्यांच्या बाबतीत वेगवेगळी दिलेली आहे. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांना सेवेतून काढता येणार नाही. न्यायालयात गेलेले आदिवासी हे बोगस आहेत. न्यायालयाने जात पडताळणी समितीकडे निर्णय सोपविल्यानंतर समितीचा निर्णय येईपर्यंत न्यायालय अंतिम निर्णय देणार नाही किंवा जात पडताळणी समितीकडे प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर केल्यानंतर न्यायालयात गेल्यावर त्याला स्थगिती मिळते आणि समितीचा निर्णय लागेपर्यंत बोगस आदिवासी सर्व सोयी सुविधांचा लाभ घेतो. या संदर्भात जात पडताळणी समितीने विहित मुदतीत जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र देणेबाबत व जात पडताळणी समितीचा निकाल लागल्यानंतर संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांविरुद्ध ताबडतोब योग्य ती कारवाई करणेबाबत शासनाने एक विशेष शासन निर्णय काढून तो काटेकोरपणे लागू करण्याबाबतची त्वरित कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच अनुसूचित जमाती पडताळणी समिती, औरंगाबाद या कार्यालयाकडे बीड जिल्हा परिषद कार्यालयातील विभागानिहाय संवर्गातील अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांची एकूण १५२ प्रकरणे जात वैधता पडताळणी समितीकडे प्रलंबित आहे. प्रलंबित असलेल्या प्रकरणाबाबत जात पडताळणी समितीने तात्काळ निर्णय घेऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

४.१५ जिल्हा परिषद कार्यालयात विभागनिहाय अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या व रिक्त असलेल्या पदांमध्ये सरळसेवाद्वारे भरावयाची २६ पदे व पदोन्नतीद्वारे भरावयाची ३७ पदे रिक्त दाखविण्यात आली आहे. अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवण्यात आलेली सरळसेवा व पदोन्नतीद्वारे भरावयाची एकूण ६३ पदे तात्काळ भरण्यात यावी व रिक्त पदे भरण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

४.१६ दिनांक १७ जुलै २०१० रोजी आष्टी (जि. बीड) येथे जमातीच्या प्रमाणपत्रासाठी कॅम्प लावण्यात आला होता. समितीप्रमुख, जिल्हाधिकारी यांच्यासह उप विभागीय अधिकारी, तहसीलदारांसह अनेक अधिकारी त्यावेळी उपस्थित होते. या कॅम्पमध्ये भिल्ल, पारधी, ठाकर, महादेवकोळी जमातीच्या

लोकांची दाखल झालेल्या ५०० प्रकरणी कोणतीही कारवाई न होता ही प्रकरणे प्रलंबित आहेत. आदिवासींना जमातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी तहसीलदार व उप विभागीय अधिकारी कार्यालयात अनेकवेळा जाऊन सुध्दा त्यांना अद्यापपर्यंत जमातीचे प्रमाणपत्र देण्यात आलेले नसल्यामुळे आदिवासी जमातीच्या लोकांना शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच उप विभागीय अधिकारी कार्यालयात गेलेल्या आदिवासींना जात प्रमाणपत्रासाठी तहसील कार्यालयामध्ये जाण्यास सांगतात. तर तहसीलदार, उप विभागीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयाकडे जाण्यास सांगत असतात, त्यामुळे आदिवासी जमातीच्या लोकांची पिळवणूक होत आहे याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जात प्रमाणपत्र आठ दिवसात देण्यात येईल असे सांगण्यात येते. परंतु, अद्यापपर्यंत त्यांना जाणीवपूर्वक व हेतुपूरस्सर जात प्रमाणपत्र देण्यात आले नाही. आदिवासींना जात प्रमाणपत्र देण्यासाठी टाळाटाळ करणाऱ्या तहसीलदार व उप विभागीय अधिकारी तसेच संबंधित जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध चौकशी करून त्यांचेविरुद्ध कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

४.१७ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३६ च्या पोट-कलम (२) मध्ये, अनुसूचित जमातीतील व्यक्तींच्या वहिवाटी जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरी खेरीज हस्तांतरित केल्या जात नाहीत, जमातीतील एखाद्या व्यक्तीची वहिवाट हस्तांतरित करण्यात आली असेल तर, त्या ठिकाणी, जमातीतील व्यक्तीने, अशा वहिवाटीच्या कब्जाच्या हस्तांतरणापासून तीस वर्षांच्या आत जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज केल्यानंतर, हस्तांतरित केलेली जमीन, जमातीतील व्यक्तीकडे परत करण्यात येईल अशी तरतूद आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता व कुळवहिवाट कायदा (सुधारणा) अधिनियम, १९७४ च्या प्रारंभापूर्वी म्हणजेच दिनांक ६ जुलै १९७४ पूर्वी कोणत्याही वेळी आपल्या वहिवाटीचा कब्जा जमातेतर व्यक्तीकडे हस्तांतरित केला असेल, किंवा जमातेतर व्यक्तीच्या किंवा हितसंबंधी उत्तराधिकाऱ्याच्या कब्जात असेल किंवा कृषीतर वापराखाली आणली नसेल तर, जिल्हाधिकारी, कोणत्याही वेळी स्वत: होऊन किंवा जमातीतील व्यक्तीने किंवा हितसंबंधित उत्तराधिकाऱ्याने, जमीन हस्तांतरित केल्याच्या प्रारंभापासून तीस वर्षांच्या आत अर्ज केल्यानंतर व या प्रकरणी चौकशी केल्यानंतर वहिवाटीचे हस्तांतरण हितसंबंधी उत्तराधिकाऱ्याच्या कब्जातून वहिवाट काढून घेण्यात यावी व अशी वहिवाट जमातीतील व्यक्तीकडे किंवा हितसंबंधी उत्तराधिकाऱ्याकडे परत देण्यात यावी. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि कुळवहिवाट कायदा (सुधारणा) अधिनियम, १९७४ च्या प्रारंभाच्या वेळी किंवा तद्नंतर, कोणतीही वहिवाट हस्तांरित करण्यात आल्याचे दिसून आल्यानंतर जिल्हाधिकारी एकतर स्वाधिकारे किंवा अशा वहिवाटीमध्ये हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने वहिवाटीचे हस्तांतरण झाल्याच्या दिनांकापासून तीस वर्षांच्या आत अर्ज केल्यानंतर या प्रकरणी चौकशी करून त्याबाबतचा

निर्णय घेण्यात यावा. जमाती हस्तांतरणकर्त्यांने केलेल्या अर्जावरून हस्तांतरणकर्त्याला जमीन प्रत्यर्पित करण्यात येते. परंतु तीस वर्षांची उक्त कालमर्यादा यापूर्वीच समाप्त झाली आहे. या तीस वर्षांच्या कालावधीत, जमातीची जमीन प्रत्यर्पित करण्याच्या बहुतांश प्रकरणांवर निर्णय घेण्यात आला आहे व ती प्रकरणे निकालात काढण्यात आली आहेत. महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ नुसार जमातीतील व्यक्तीने अर्ज केला नसला तरी, जिल्हाधिकाऱ्यानी स्वधिकारात चौकशी केल्यानंतर अशी प्रकरणे हाती घेण्यासाठी देखील त्यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ याअन्वये, जिल्हाधिकाऱ्याने, स्वधिकारात चौकशी करण्याकरिता कोणतीही कालमर्यादा नाही. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, जिल्हाधिकारी, कालमर्यादा समाप्त झाल्याच्या सबबीखाली या अधिकारांचा वापर करत नाहीत व अशी प्रकरणे निकालात काढत नाहीत, त्यामुळे जमातीच्या अनेक व्यक्तींना त्यांच्या जमिनी प्रत्यर्पित करण्यापासून वंचित राहावे लागत आहे. म्हणून, शासनाने जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अर्ज करण्याची मुदत दिनांक ६ जुलै २००४ पासून आणखी तीस वर्षापर्यंत कालमर्यादा वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.

**४.१८ वरील कायद्यातील तरतुदीच्या अनुषंगाने समितीने आदिवासी जिल्ह्यात भेटी दिल्या असता असे निदर्शनास आले आहे की, जिल्ह्यातील पारधी, भिल्ल, ठाकर, महादेव कोळी यांच्या जमिनी जनजातीतर व्यक्तींकडे हस्तांतरित झालेल्या आहेत. अनुसूचित जमातींना त्यांच्या जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ मध्ये सुधारणा करून आदिवासींना त्यांच्या जमिनी बिगर आदिवासींकडून परत देण्यासाठी दिनांक ६ जुलै २००४ पासून ३० वर्षांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. आदिवासींच्या जमिनीची बिगर आदिवासीकडे विक्री करणे, देणगी देऊन अदलाबदल करणे, गहाण ठेवणे इत्यादी प्रकारे जनजातीच्या व्यक्तीकडे हस्तांतरित करता येत नाही. परंतु असा प्रकार घडल्यास कोणत्याही वेळी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत जमीन हस्तांतरणकर्त्याला त्यांची जमीन परत करण्याची कारवाई करता येईल अशी तरतूद असताना देखील बीड जिल्हाधिकाऱ्यांकडून तसेच उर्वरित अन्य जिल्हाधिकाऱ्यांकडून अद्यापपर्यंत एकाही प्रकरणात जमीन हस्तांतरणाची कारवाई करण्यात आल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अनुसूचित जमातीच्या बिगर आदिवासींकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या सर्व प्रकरणांची तात्काळ चौकशी करून आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासी यांच्याकडून हस्तांतरित करण्याची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

**पिंप्री-आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथील सर्व्हे नं. ९८ व ९९ मध्ये आदिवासी ठाकर समाजाच्या जमिनीचे हस्तांतरण बेकायदेशीर जनजातीतर व्यक्तींकडे झालेले असून जिल्हाधिकारी, बीड यांनी याप्रकरणी स्वाधिकारे कारवाई करून केलेल्या कारवाईचा अहवाल तात्काळ समितीला सादर करावा. अशी समितीची शिफारस आहे.**

**नंदुरबार, जिल्हापरिषद :—**

**(५) जिल्हा परिषद कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे जातपडताळणी समितीकडे सादर केलेले प्रस्ताव :—**

५.१ समितीने दिनांक ११ फेब्रुवारी २०११ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नंदूरबार यांनी जिल्हापरिषदेच्या, कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या ११४५ कर्मचाऱ्यांना दिनांक १ फेब्रुवारी २०११ पर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबत नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत. त्यामध्ये सन १९९५ पूर्वीचे ७४९ व सन १९९५ नंतरचे ३९६ कर्मचारी आहेत. यापैकी ४५८ कर्मचाऱ्यांनी जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केले आहेत व ३४९ कर्मचाऱ्यांकडून वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. तसेच दिलेल्या मुदतीमध्ये वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे ३१५ कर्मचाऱ्यांना सेवामुक्त करण्यात आले होते. परंतु त्यानंतर ३१५ कर्मचाऱ्यांपैकी १२० कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले असून ९८ कर्मचाऱ्यांनी जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केले आहेत. उर्वरित १९ कर्मचाऱ्यांना पदावनत केलेले आहे. ४ कर्मचारी मयत झाले आहेत. असे समितीला सांगण्यात आले. १२० कर्मचाऱ्यांनी जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केलेले असल्यामुळे त्यांची सेवा पूर्ववत सुरू ठेवण्यात यावी अशी विनंती केलेली आहे. समितीने उर्वरित ११२ कर्मचारी हे खरे आदिवासी नसल्यामुळे त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र दिलेले नाही किंवा जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केलेले नाहीत. त्यामुळे त्यांची सेवा समाप्त करण्यात यावी असे निदेश दिले. जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेल्या ५५६ प्रकरणापैकी एकही प्रकरण आजपर्यंत तपासून आलेले नाही, त्यांची कारणे काय अशी समितीने विचारणा केली असता उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी समितीस असे सांगितले की, काही कर्मचाऱ्यांकडे वैधता प्रमाणपत्रे होती. त्यावेळी ती त्यांनी आणून दिलेली नाही. परंतु समितीने दिलेल्या निदेशानंतर ४६९ प्रमाणपत्रे प्राप्त झालेली आहेत. ज्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र किंवा पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केले नाही अशा ११२ कर्मचाऱ्यांची सेवा दिनांक १ फेब्रुवारी २०११ पासून समाप्त करण्याचे आदेश काढलेले आहेत, असे समितीला सांगितले. या कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्तीचे आदेश निर्गमित झाले नसतील तर ही प्रक्रिया दिनांक २८ फेब्रुवारी २०११ पर्यंत थांबविण्यात यावी त्यानंतर देखील या कर्मचाऱ्यांनी प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्यांना सेवा समाप्तीचे आदेश पाठविण्यात यावे, असे समितीने निदेश दिले. सेवेत लागल्यानंतर कर्मचाऱ्यांनी ६ महिन्यांत वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जात पडताळणी समितीच्या स्टाफिंग पॅटर्न १९९४ साली ठरविलेला आहे. या समित्यांकडे प्रकरणाची संख्या वाढत असल्यामुळे समितीचा स्टाफिंग पॅटर्न बदलविण्यात यावा. जेणेकरून जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेली प्रकरणे लवकर निकाली काढता येतील, असे समितीचे निदेश आहेत.

अभिप्राय व शिफारशी :

**५.२ जिल्हा परिषद, नंदुरबार या कार्यालयातील विभागांतर्गत अनुसूचित जमातीच्या एकूण ११४५ कर्मचाऱ्यांपैकी सन १९९५ पूर्वीचे ७४९ व सन १९९५ नंतरचे ३९६ कर्मचारी कार्यरत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. साक्षीच्या वेळी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने एकूण ४६९ कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयास सादर केले आहे. तथापि, जात पडताळणी समितीकडे ५५६ प्रकरणे प्रलंबित आहेत. उर्वरित १२० कर्मचाऱ्यांनी जात वैधता पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केलेले असल्यामुळे त्यांची सेवा पूर्ववत सुरू ठेवण्यात यावी, अशीही विनंती केलेली आहे. उर्वरित ११२ कर्मचारी हे खरे आदिवासी नसल्यामुळे त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र दिलेले नाही किंवा जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केलेला नाही. त्यामुळे दिनांक २८ फेब्रुवारी २०११ नंतर किती कर्मचाऱ्यांविरुद्ध सेवा समाप्तीची कारवाई करण्यात आली आहे याबाबत व जात पडताळणी समितीच्या बदलविण्यात येणाऱ्या स्टॉफिंग पॅटर्नबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला लवकरात लवकर पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

(६) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागात रिक्त असलेली पदे :

६.१ जिल्हा बैठकीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाबाबत समिती माहिती घेत असताना प्राथमिक शिक्षकांची ८५२ मंजूर पदे व ८९५ भरलेली पदे दाखविली आहेत. जिल्हा विभाजनामुळे अनुसूचित जमाती प्रवर्गात सद्यःस्थितीत प्राथमिक शिक्षकांची ४० अतिरिक्त पदे कार्यरत आहेत. परंतु या ठिकाणी एकूण ४३ पदे रिक्त असल्याचे दिसत आहेत. म्हणजेच ३ पदे अतिरिक्त भरण्याची कारणे काय याबाबत साक्षीच्यावेळी परिपूर्ण माहिती सादर करावी असे समितीने निदेश दिले. साक्षीच्या वेळी समितीला पुढीलप्रमाणे लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली.

६.२ प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद, नंदुरबार अंतर्गत प्राथमिक शिक्षक संवर्गात अनुसूचित जमाती प्रवर्गाची एकूण ८५२ पदे मंजूर असून ८९५ पदे कार्यरत आहेत. सन १९९८ मध्ये नंदुरबार जिल्हा निर्मिती झाल्यानंतर प्राथमिक शिक्षक संवर्गाची बिंदुनामावली अद्ययावत नव्हती. सन २००७ मध्ये बिंदुनामावली नोंदवही अद्ययावत करणेत येऊन सहा. आयुक्त (मा.क.), नाशिक विभाग, नाशिक यांचेकडून दिनांक ६ फेब्रुवारी २००७ रोजी पडताळणी केली असता एकूण मंजूर पदे ३७६७ आहेत. त्यापैकी अनुसूचित जमातीच्या प्रवर्गाची एकूण ८२९ पदे मंजूर होती परंतु कार्यालयात ९४३ पदे कार्यरत होती म्हणजेच ११४ पदे जादा कार्यरत होती. प्राथमिक शिक्षक संवर्गात वस्तीशाळांचे रूपांतर जिल्हा परिषद शाळेत झाल्याने २१७ पदांची वाढ झाली त्यानुसार दिनांक २१ फेब्रुवारी २००९ रोजी बिंदुनामावली नोंदवहीची पुनर्रपडताळणी केली असता एकूण मंजूर ३७८१ पदांपैकी अ.ज.प्रवर्गासाठी ८५२ पदे राखीव होती तथापि, सेवेत ८९५ पदे कार्यरत असल्याने ४३ पदे अतिरिक्त कार्यरत आहेत. अतिरिक्त ४३ पदांपैकी आंतर जिल्हा बदलीमुळे ०३ पदे कमी झाली असून सद्या ४० पदे जादा

आहेत. जिल्ह्यात अनुदानित संस्था ७६ व विना अनुदानित संस्था १४ आहे. संस्थाचालक हे निवड व नियुक्त अधिकारी आहेत. अनुदानित व विना अनुदानित संस्थेमध्ये अनुसूचित जमातीची एकूण ४६९ पदे राखीव ठेवण्यात आलेले असून त्यापैकी ४२६ पदे भरण्यात आली व पुढील संस्थानिहाय प्रमाणे एकूण ४३ पदे रिक्त आहेत. (१) अध्यापक शिक्षण मंडळ, धुळे-४, (२) शहादा तालुका को-ऑप.एज्यु.सोसा., शहादा-१२, (३) याहामोगी शिक्षण प्रसारक संस्था, नागसर-४, (४) पिपल्स एज्यु. सोसायटी, तळोदा-०८, (५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वांगीण विकास संस्था, नंदुरबार-३, (६) जय हिंदळामाता शैक्षणिक संस्था, धनराट-४, (७) आदिवासी देवमोगरा एज्यु. सोसा., नटावद-०८.

६.३ समितीने अनुसूचित जमातीचे जे शिक्षक नेमले आहेत त्याची जात वैधता प्रमाणपत्र आहे किंवा नाही हे तपासले आहे काय, ज्या संस्थेमध्ये अनुसूचित जमातीची पदे रिक्त असतील अशा संस्थांचे अनुदान रद्द करण्यात येत आहे अशाप्रकारची संबंधित संस्थांना नोटीस देण्यात यावी व १५ दिवसांत समितीला अहवाल सादर करावा असे निदेश दिले. दिलेल्या निदेशानुसार या कार्यालयाचे दिनांक १६ जुलै २०१० पत्रान्वये ज्या संस्थेत अनुसूचित जमातीचे पदे रिक्त आहेत अशा संस्थांना नोटीसा पाठविण्यात आलेल्या आहेत, अशी समितीला माहिती देण्यात आली.

६.४ समितीने माध्यमिक शिक्षण विभागाची सद्य:स्थिती काय आहे त्याबाबत विभागाने कोणती कार्यवाही केली आहे अशी विचारणा केली, शिक्षणाधिकारी यांनी ८ संस्थांमध्ये ४६ पदे रिक्त आहेत. रिक्त पदे न भरल्यास संबंधित संस्थांना अनुदान बंद करण्यात येईल, अशाप्रकारच्या नोटिसा दिलेल्या आहेत. याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या नोव्हेंबर, २००९ चा शासन निर्णयामध्ये शैक्षणिक संस्थांकडून अनुसूचित जमातीचा अनुशेष भरण्यात आला नाही तर संस्थांचे अनुदान बंद करण्याच्या सूचना आहेत व शैक्षणिक संस्थेमध्ये कार्यरत असलेल्या अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांकडून जात वैधता प्रमाणपत्र घेण्याचे नमूद केलेले आहे, असे समितीला सांगितले. संस्थेने त्या आदेशाचे पालन केले आहे काय, माध्यमिक शिक्षण विभागाने अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची पदे भरली आहेत किंवा नाहीत हे पाहण्याची जबाबदारी माध्यमिक शिक्षण विभागाची आहे. माध्यमिक शाळांतील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या आरक्षणाविषयी बैठकीच्यावेळी माहिती देण्यात आली नाही. तसेच समितीच्या असेही निदर्शनास आले की, बिंदुनामावली तपासण्यामध्ये अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे अशा संस्थांच्या माध्यमिक शाळांची बिंदुनामावली नोंदवहीची तपासणी करण्याबाबत सांगितले होते अशी समितीने पृच्छा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांनी ज्या संस्थांनी रोस्टर तपासले नसेल तर त्यांच्या पदांना मान्यता देत नाही. शासन निर्णयाप्रमाणे त्यांची अंमलबजावणी लगेच करण्यात येणार असून संबंधित संस्थांनी जिल्हापरिषदेच्या आदेशाचे पालन न केल्यास अनुदान थांबविता येईल असे त्यांना कळविण्यात आले आहे असे समितीला सांगितले. शैक्षणिक संस्थांनी

आदेशांचे पालन केले नसल्यास, त्यांचे अनुदान थांबवावे. ज्या संस्था अनुसूचित जमातीच्या आरक्षित जागा भरत नाहीत, ज्यांना दिनांक ५ नोव्हेंबर २००९ शासन निर्णय मान्य नाही, अशा सर्व संस्थांचे अनुदान थांबविण्यात यावे व अनुसूचित जमातीसाठी रिक्त असलेल्या जागा भरून समितीला त्यासंबंधीचा अहवाल पाठविण्यात यावा, असे निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

**६.५ प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार या विभागाने बिंदुनामावली नोंदवहीची पूर्णपडताळणी केल्यानंतर प्राथमिक शिक्षण विभागात एकूण मंजूर ३७८१ पदांपैकी अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ८५२ पदे राखीव असतांना प्रत्यक्षात सेवेत ८९५ पदे कार्यरत आहे. म्हणजेच ४३ पदे जादा कार्यरत आहेत. जिल्ह्यात अनुदानित संस्था ७६ व विनाअनुदानित संस्था १४ या संस्थेमध्ये अनुसूचित जमातीची एकूण ४६९ पदे राखीव ठेवण्यात आलेली आहे. त्यापैकी ४२६ पदे भरण्यात आलेली असून ४३ पदे रिक्त आहेत. तसेच माध्यमिक शिक्षण विभागात ४६ पदे रिक्त आहेत. शासन निर्णयानुसार खाजगी संस्थांना भरती करण्याचे अधिकार असून या संस्था शासनाच्या अनुदानावर चालत असतात, अशा संस्थांनी अनुसूचित जमातीचा अनुशेष भरला नाही तर त्याचे अनुदान बंद करण्यात यावे, असा सामान्य प्रशासन विभागाचा दिनांक ५ नोव्हेंबर २००९ चा शासन निर्णय आहे. त्यानुसार अनुदानित व विना अनुदानित संस्थेमध्ये अनुसूचित जमातीची रिक्त असलेली पदे भरण्यात येत नाहीत, तोपर्यंत संबंधित संस्थांचे अनुदान थांबविण्याबाबतची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

**(७) अक्कलकुवा व धडगाव तालुक्यात पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा :-**

**७.१** समितीने शौचालये बांधताना ५० टक्के रक्कम घेतल्याशिवाय निधी देऊ नये असे शासनाचे आदेश आहेत. हगणदारीमुक्ती कार्यक्रम तसेच संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान यासारख्या चांगल्या योजना ग्रामविकास विभागाने राज्यात सुरू केल्या आहेत. परंतु केवळ १३ हजार रुपये देऊन शौचालये न बांधता संपूर्ण कामेच प्रलंबित ठेवायची हे योग्य नाही. म्हणून संबंधित उप अभियंत्यांवर कोणती कारवाई करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा असे समितीने निदेश दिले होते. साक्षीच्या वेळी लेखी स्वरूपात पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली.

७.२ सन २००७-०९ मध्ये विहिरी, नळ पाणीपुरवठा योजनाची कामे घेण्यात आलेली असून त्यातील विहिरींची कामे पूर्ण केलेली आहेत. हागंदारी मुक्ततेच्या अटीमुळे देय १०% रक्कम रु.१३,००० समितीस अदा करण्यात आलेली नाही. हागंदारी मुक्तीची अटी अभावी विहिरी व पाणी पुरवठा योजनांची कामे अंतिम होऊ शकली नाहीत. ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमाअंतर्गत हाती घेण्यात

आलेल्या योजनांसाठी निधीचा प्रथम हप्ता देतांना गाव / पाडा ६०% हागंदारीमुक्त असणेबाबत शासन निर्णयान्वये बंधनकारक आहे. परंतु निधीचा दुसरा हप्ता मुक्त करतांना गाव १००% हागंणदारी मुक्तीची अट असल्याने घेण्यात आलेल्या उपाययोजना अंतिम होऊ शकल्या नाहीत. तालुकास्तरावर गाव/ पाडे हागंदारी मुक्त होणेबाबतच्या नियंत्रणाबाबत गट विकास अधिकारी पं. स. अक्कलकुवा/धडगाव तसेच उप अभियता ग्रा.पा.पु. उप विभाग मोलगी यांना दिनांक २८ जानेवारी २०११ पत्राअन्वये अक्कलकुवा व धडगाव तालुक्यातील गाव/ पाडे १००% हागंदारी मुक्त न केलेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे व तातडीने कार्यवाही करणे बाबत सूचीत केले आहे. नंदुरबार ह्या आदिवासी जिल्ह्यात गाव/पाड्यात पिण्याच्या पाण्याची प्राथमिक सोय उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याने त्यासाठी हागंदारी मुक्तीची अट शिथील करण्याची मागणी मा. मंत्री, पाणीपुरवठा विभाग यांना करण्यात आलेली आहे. उक्त माहितीच्या अनुषंगाने सचिव व ग्रामविकास यांनी विहिरींची व पाणीपुरवठ्याची कामे देण्या संदर्भात हागणदारीमुक्त गावाची अट टाकण्यात आली आहे. त्यामध्ये विहिरींची कामे घेतली होती, त्यांना ९० टक्के पेमेंट दिले होते व १० टक्के पेमेंट बाकी ठेवले आहे. गट विकास अधिकारी व उप अभियंता यांनी या संदर्भात नोटिसेस काढल्या आहेत. तातडीने कार्यवाही करण्याबाबत सांगितले आहे. गाव हगणदारीमुक्त झाले असते तर १० टक्के निधी देखील देता आला असता. गाव हगणदारीमुक्त होत नाही तोपर्यंत पैसे द्यायचे नाहीत अशी अट आहे. गाव हगणदारीमुक्त न झाल्यामुळे १० टक्क्यांचा हप्ता दिलेला नाही असे समितीला सांगितले.

७.३ पाणीपुरवठा विभागाच्या शासन निर्णयानुसार सर्व अधिकार सरपंचांना दिले आहेत,शासन निर्णयाचा फटका संपूर्ण महाराष्ट्राला बसला आहे आणि त्यामुळेच नळ पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्या नाहीत, सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर नियंत्रणाचे अधिकार देखील नाहीत. ठाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी भाग आहे. दुसऱ्या जिल्ह्यात कमी प्रमाणात आदिवासी लोक असतील, आपण एका बाजूला म्हणतो की, शौचालय स्वच्छ असले पाहिजे. आपण शौचालय जबरदस्तीने बांधायला लावता, पण आदिवासी लोक ते वापरत नाहीत. शौचासाठी शौचालयाचा वापर केला पाहिजे. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद सदस्यांना देखील निवडणुकीमध्ये या संदर्भात बंधन घातले आहे. शौचालय वापरले पाहिजे, असे सांगितले आहे. आदिवासी भागात शौचालय वापरले जात नाही. शहरी भागात ठीक आहे. नंदुरबार जिल्हा परिषदेचे पूर्वीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निष्काळजीपणामुळे जवळपास ५ कोटी रुपये परत गेले. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी असे करणे योग्य नाही. जनरल बॉडीने घेतलेल्या निर्णयाला मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विरोध केल्यामुळे त्या वर्षांचे ५ कोटी रुपये परत गेले. आपण या संदर्भात चौकशी करावी. जनरल बॉडीमध्ये २/३ ची बहुमत होते आणि तरी देखील मुख्य कार्यकारी अधिकारी असे करत असतील तर हे बरोबर नाही. आपण या संदर्भात चौकशी करावी. संपूर्ण महाराष्ट्रात नाही एवढी सुंदर जिल्हा परिषदेची इमारत नंदुरबार जिल्हा परिषदेने

बांधली आहे. समितीने एकूण ५२ सदस्यांमधील ४३ सदस्य सकारात्मक असताना व सर्व ठराव झाले असताना, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी हेका धरणे हे बरोबर नाही. ५ कोटी रुपये खर्च झाले नाहीत. परिणामी, जिल्हा परिषदेचे नुकसान झाले आहे. समितीची शिफारस आहे की, सचिव महादेयांनी त्या प्रकरणाची चौकशी करावी. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, पदाधिकारी आदिवासी आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी असे कसे वागू शकतात. सर्वसाधारण सभेने केलेल्या ठरावाला मुख्य कार्यकारी अधिकारी विरोध कसे काय करू शकतात, अशी विचारणा केली त्यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी पैसे लॅप्स झालेले नाही. आता खर्च करता येईल असे समितीला सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

७.४ हागणदारीमुक्ती कार्यक्रम तसेच संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान यासारख्या चांगल्या योजना ग्रामविकास विभागाने राज्यात सुरू केल्या आहेत. हागणदारीमुक्तीच्या अटीमुळे विहिरी व पाणीपुरवठा योजनांची कामे अंतिम होऊ शकली नाही. शौचालय बांधतांना ५० टक्के रक्कम घेतल्याशिवाय निधी वितरीत करू नये, असे शासनाने आदेश आहेत. नंदूरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा व धडगांव हे तालुके १००% हागणदारी मुक्त न केल्यामुळे तातडीने कार्यवाही करणेबाबत सुचित केले आहे. या भागात पिण्याच्या पाण्याची प्राथमिक सोय उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यासाठी हागणदारी मुक्तीची अट शिथिल करण्याची मागणी पाणीपुरवठा विभागाच्या मंत्र्यांकडेही केली आहे. गाव हागणदारीमुक्त होत नाही, तोपर्यंत पैसे द्यायचे नाहीत असा पाणीपुरवठा विभागाचा शासन निर्णय आहे. त्यामुळे राज्यात नळ पाणीपुरवठा विभागाच्या योजना अपूर्ण आहेत. आदिवासी भागात शौचालय वापरले जात नाही, असे म्हणनेही ते बरोबर नाही. नंदुरबार जिल्हापरिषदेच्या निष्काळजीपणामुळे यापूर्वी ५ कोटी रुपये परत गेले आहेत. आदिवासी भागात प्राथमिक सोय उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. या संदर्भात चौकशी करण्यात यावी. ५ कोटी रुपये खर्च झाले नाहीत, परिणामी जिल्हा परिषदेचे नुकसान झालेले आहे. जिल्हापरिषदेचे पदाधिकारी आदिवासी आहेत. सद्यःस्थिती हा निधी व्यपगत झालेला नाही. अक्कलकुवा व धडगांव तालुक्यांत परिस्थिती गंभीर असल्याने हागणदारी मुक्तीची अट शिथिल करून व निधी उपलब्ध असल्याने आदिवासी भागात शौचालये बांधण्याची कारवाई तातडीने सुरू करण्यात यावी तसेच जिल्हापरिषदेत प्राप्त झालेला निधी खर्च न करण्यास जबाबदार असणाऱ्या यापूर्वीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची चौकशी करून त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

७.५ अक्कलकुआ, धडगाव या भागात परिस्थिती अतिशय गंभीर आहे. आदिवासी विकास विभागाच्या फंडातून सब स्टेशन बांधली आहेत. परंतु, १८० ॲम्पिअर वीज कॅपॅसिटी असताना त्याचा योग्य वापर केला जात नाही, आदिवासींना इलेक्ट्रिक कनेक्शन देण्यात आलेले नाहीत. सदर ठिकाणी सब स्टेशन्स बांधली आहेत. आदिवासींना वीज कनेक्शन देणे अत्यंत आवश्यक आहे. आदिवासींना वीज कनेक्शन दिले तर फार मोठ्या प्रमाणात आदिवासींचे प्रश्न सुटू शकतील अशी विचारणा केली, त्यावर प्रधान सचिव यांनी आदिवासींना जवळपास ९ हजार वीज पंप वाटले आहेत, त्यांचे पैसे भरले आहेत. ए-१ फॉर्म भरले आहेत. परंतु, अद्याप त्यांच्या वीज पंपांना विजेचे कनेक्शन मिळालेले नाहीत. तसेच, सन २००३-०४ च्या अगोदर प्रस्ताव देखील दिलेले आहेत. सदर ठिकाणी अद्यापही वीज कनेक्शन मिळालेले नाही असे समितीला सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

**७.६ अक्कलकुवा व धडगांव या भागात आदिवासी विकास विभागाच्या फंडातून वीज सब स्टेशन बांधली आहेत, परंतु आदिवासींना वीज जोडणी केलेली नाही, आदिवासींना जवळपास ९ हजार वीज पंप वाटले आहे, त्याचे पैसेसुद्धा भरले आहेत, ए-१ फॉर्म भरले आहे, परंतु आदिवासींच्या वीज पंपांना विजेची जोडणी केलेली नसल्याने आदिवासी लोकांना विजेपासून वंचित रहावे लागत आहे. यासंदर्भात तातडीने कारवाई करून आदिवासी लोकांच्या विजपंपांना वीज जोडणी करून देणेबाबत कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

(८) जिल्ह्यातील आदिवासी मुलींच्या आश्रमशाळा व वसतिगृह येथे आढळून आलेल्या त्रुटी :—

८.१ शहरी भागातील मुलींचे वसतिगृह ज्याप्रमाणे गैरसोयीचे असते, त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील मुलींच्या आश्रमशाळेमध्ये राहण्याची, आंघोळीची स्वच्छतागृहाची, खाण्यापिण्याची, झोपण्याची वगैरे अत्यंत वाईट परिस्थिती आहे. ग्रामीण भागातील मुलींच्या आश्रमशाळांच्या इमारती या भाड्याच्या आहेत. ग्रामीण भागातील मुलींच्या आश्रमशाळेमधील एका खोलीमध्ये एकूण २५ मुलींना कोंबलेले आहे. या ठिकाणी स्वच्छतागृह व शौचालये यांचीही परिस्थिती अत्यंत वाईट आहे. अशी समितीने विचारणा केली. त्यावर प्रधान सचिव आदिवासी विकास विभाग यांनी, अशाप्रकारे राज्यामध्ये भाड्याच्या इमारतीमध्ये स्थित असलेल्या मुलींच्या आश्रमशाळांकरिता व वसतिगृहाकरिता एकूण ५५० कोटी रुपयांच्या नवीन कामांचे आदेश गेल्या दोन महिन्यांमध्ये दिलेले आहेत. या संदर्भात तपासणी करून योग्य ते आदेश देण्यात येतील, असे समितीला सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

८.२ जिल्ह्यातील प्रकल्प अधिकारी क्षेत्राअंतर्गत असलेल्या मुलींच्या आश्रमशाळा/वसतीगृह येथे समितीने भेट दिली असता अनेक त्रुट्या निदर्शनास आलेल्या आहेत. शहरी भागातील मुलींचे वसतीगृह ज्याप्रमाणे गैरसोयीचे आहे, त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील मुलींच्या आश्रमशाळेमध्ये राहण्याची, आंघोळीची, स्वच्छतागृह, इत्यादींची अत्यंत वाईट परिस्थिती आहे. ग्रामीण भागातील मुलींच्या आश्रमशाळा भाड्याच्या इमारतीमध्ये आहेत. भाड्याच्या इमारतीमध्ये असलेल्या मुलींच्या आश्रमशाळा व वसतीगृहाकरिता निधी मंजूर असून नवीन कामांचे आदेश देण्यात आलेले आहे. नंदुरबार जिल्ह्यातील प्रकल्प अधिकारी क्षेत्रात येत असलेल्या मुलींच्या आश्रमशाळा व वसतीगृहाची तपासणी करून नवीन इमारतीचे बांधकाम सुरू असल्याबाबत व मुलींच्या आश्रमशाळा/वसतीगृहांना आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यात आल्या आहेत, याबाबत जिल्ह्यातील तालुकानिहाय मुलींच्या आश्रमशाळा व वस्तीगृहांचे सर्वेक्षण करून आढळून आलेल्या त्रुटींबाबत जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(९) प्राथमिक आरोग्य केंद्राना सोयीसुविधा व अनुदान उपलब्ध करून देणे :-

९.१ समितीने दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने पिंपळखुटा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मुल्ला हे ४ वर्षापासून प्रतिनियुक्तीवर आहेत. त्या ठिकाणी रात्रीच्यावेळी कर्मचारी राहत नाही. ॲब्युलंससाठी ड्रायव्हर नाही. डॉक्टर ऐवजी शिपाई गोळ्या देतात. अशी समितीला भेटीच्यावेळी माहिती मिळाली असता त्यांच्यावर कारवाई प्रपोज करावी त्या प्राथमिक आरोग्य केंद्रावर दुसरे डॉक्टर उपलब्ध करून द्यावेत. रात्रीच्या वेळी त्या ठिकाणी कर्मचारी राहतील, या दृष्टिने कार्यवाही करण्यात यावी असे समितीने निदेश दिले साक्षीच्यावेळी समितीने दिलेल्या निदेशानुसार पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली. डॉ. एस. एस. मुल्ला हे वैद्यकीय अधिकारी गट अ म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळखुट, तालुका अक्कलकुवा येथे दिनांक १९ जून २००५ पासून कार्यरत आहेत. नंदुरबार जिल्ह्यात कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करणारे सर्जन कमी होते त्यामुळे डॉ. एस. एस. मुल्ला वैद्यकीय अधिकारी पिंपळखुटा यांना मंगळवार प्राथमिक आरोग्य केंद्र सोमावल, तालुका तळोदा, बुधवार- प्राथमिक आरोग्य केंद्र खापर, गुरुवार- प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळखुटा व शुक्रवार- रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र काठी येथे आयोजित शिबीरात कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेचे काम करणेसाठी आदेशित केले होते. उर्वरित दिवशी मुख्यालयाच्या ठिकाणी राहून कार्यालयीन कामकाज करण्याचे आदेशित असतांना ते कार्यालयीन कामकाज करीत नव्हते असे प्रशासनाच्या निदर्शनास आल्याने त्यांचे विरुद्ध शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित करून सहायक आयुक्त चौकशी नाशिक यांच्याकडे विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. चौकशीचे कामकाज सुरू असून अंतिम चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर शिक्षा प्रस्तावित करण्यात येईल अशी माहिती दिली. समितीने चौकशी अंती केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

९.२ प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ॲम्ब्युलन्स आहे. वाहन चालक मयत झाल्याने कंत्राटी वाहन चालकाची नियुक्ती करणेत आली आहे. ड्रायव्हरचे पद रिक्त असून रात्रीच्या वेळी तातडीने डॉक्टरांना येण्याकरिता व जाण्याकरिता तसेच **प्राथमिक आरोग्य केंद्रामधून शहरी भागातील इस्पितळामध्ये इमर्जन्सी पेशंट हलविण्याकरिता ॲम्ब्यूलन्सची आवश्यकता असल्याने एका ॲम्ब्यूलन्स सोय उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

९.३ सोमवाल, प्राथमिक आरोग्य केंद्र येथे एन.आर.एच.एम. च्या माध्यमातून गत ८-९ महिन्यांपासून अनुदान मिळालेले नाही. दुर्गम भागातील ही पी.एच.सी. असून याकडे औषधे, अनुदान व इतर सोयीसुविधा यांच्या दृष्टीकोनातून शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. अशी समितीने विचारणा केली असता सचिव ग्रामविकास यांनी राज्यभरातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एकूण १३०० डॉक्टरांची नेमणूक एम.पी.सी. कडून विहित कालावधीत शक्य नसल्यामुळे ऑनलाईन करण्यात आलेली आहे. अन्यथा या पी.एच.सी. मध्ये वैद्यकीय अधिकारीही राहत नव्हते असे समितीला सांगितले. समितीने **सोमवाल, प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक असणाऱ्या सोयीसुविधा व अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

९.४ समितीने मातृत्व अनुदानाची काय परिस्थिती आहे. शासनाच्या नियमानुसार गरोदर स्त्रीला प्रसुतीपूर्व आणि प्रसुतीनंतर तपासणीकरिता विशेष अनुदान दिले जाते. प्रसुती करिताही विशेष मातृत्व अनुदान दिले जाते. या प्राथमिक आरोग्यकेंद्रामध्ये बाळंतपणाला आल्यानंतर त्या स्त्रीला कोणत्याही पायाभूत सोयीसुविधा प्राप्त होत नाही. या दृष्टीनेही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील रुग्णालये आणि शहरी भागातील रुग्णालये यांच्यामधील तफावत वाढत चालली आहे. ग्रामीण भागातील रुग्णालयांकडे कोणाचेही लक्ष नसते. तेथे औषधे, कर्मचारी, सोयीसुविधा या सर्व गोष्टींचा सतत अभाव आढळून येतो. अशी विचारणा केली असता समितीला लेखी स्वरूपात पुढील प्रमाणे माहिती देण्यात आली. सन २००९-१० या वर्षात जिल्ह्यात मातृत्व अनुदान असलेल्या एकूण पात्र लाभार्थी १८,०९४ मातांसाठी आदिवासी विकास विभागाकडून वाटपासाठी रोखीने ४०० रुपये प्रमाणे एकूण मंजूर अनुदान रुपये ७२.३८ लक्ष एवढे होते त्यापैकी ३१ मार्च २०१० अखेर गरोदर पात्र मातांना मातृत्व अनुदान लक्ष रुपये ७२.३८ गट स्तरावरून प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर वितरित करण्यात आलेले आहे. त्यामुळे मातृत्व अनुदान पात्र मातांना याबाबत १००% लाभ दिला जातो. शासनाच्या नियमानुसार गरोदर स्त्रियांना प्रसुतीपूर्व वा प्रसुतीनंतर तपासणीकरिता विशेष मातृत्व अनुदान दिले जाते. तथापि, **प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसुतीकरिता आलेल्या स्त्रियांना त्याचा लाभ अथवा सोयीसुविधा प्राप्त होत नाही, असे समितीला अनेकदा भेटीच्या वेळी आढळून आले आहे. त्यासंदर्भात योग्य आढावा घेऊन कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

९.५ नवीन २७ प्राथमिक आरोग्य केंद्र व १२५ उपकेंद्र स्थापने बाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला असून शासन स्तरावर प्रलंबित आहे. दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने सचिव, ग्रामविकास विभाग यांनी सन २००९-२०१० या वर्षात जिल्ह्यात मातृत्व अनुदान एकूण पात्र लाभार्थी १८,०९४ मातासाठी आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडून रोखीने ४०० रुपये प्रमाणे वाटपासाठी एकूण मंजूर अनुदान रुपये ७२.३८ लाख एवढे होते. विभागाकडून या सर्व मुद्यांची नोंद घेण्यात येत आहे. या सर्व मुद्यांची तपासणी करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले. **ग्रामविकास विभाग आणि आदिवासी विकास विभाग या दोन्ही विभागांनी मिळून या सर्व गोष्टींकडे लक्ष देऊन तातडीने आवश्यक ती कार्यवाही करून सर्व आदिवासी बांधवांना सोयीसुविधा पुरविण्यात याव्यात असे समितीने दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

**(१०) इंदिरा आवास योजने अंतर्गत मंजूर करण्यात आलेली घरकुलाची कामे :—**

१०.१ समितीने अक्कलकुवा या तालुक्यामध्ये दिनांक ३० जून २०१० मध्ये ८८ घरकूल योजना इंदिरा आवास योजनेच्या माध्यमातून मंजूर करण्यात आल्या होत्या. परंतु, या ८८ घरकुलांच्या प्रस्तावाचे पुढे काहीही झालेले नाही. त्यामध्ये फक्त ३३ नवीन आहेत, बाकीच्या ५५ घरांची दुरूस्ती करून ती घरे नवीन स्वरूपात दाखवून पैसे घेतलेले आहेत यासंदर्भात शासनाने आवश्यक ती चौकशी करून कार्यवाही करावी. अशी समितीने विचारणा केली असता प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी ज्या यंत्रणेने या घरकूल योजना मंजूर केल्या आहेत. त्या यंत्रणेमार्फत चौकशी करून त्याचा अहवाल आल्यानंतर शासकीय पातळीवरून यासंदर्भात कार्यवाहीचे आदेश देण्यात येतील असे समितीला सांगितले असता त्यानंतर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी इंदिरा आवास योजना, राजीव गांधी निवास योजना, ठक्करबाप्पा योजना यांसारख्या योजनांच्या माध्यमातून २२१ चौ.फु.च्या घरकुलांकरिता पैसे मिळतात किंवा घरे बांधून मिळतात. ज्यावेळी शासन पैसे देते त्यावेळी प्रत्यक्ष लाभार्थी सर्व मटेरियल आणि मजुरांची व्यवस्था करून घरकूल बांधतो. ज्यावेळी शासन घर बांधण्याकरिता मटेरियल व मजूर उपलब्ध करते त्यावेळी त्यामधील अनियमिततेची जबाबदारी शासन घेते. या घरकूल योजनेंचे प्रस्ताव मान्यतेकरिता येतात, त्यावेळी फोटो कंपल्सरी केलेले आहेत. या घरकूल योजनेंच्या प्रस्तावाच्या यादीला एकत्रितपणे प्रशासकीय मान्यता दिली जाते. त्यानंतर या योजनांकरिता निधीची उपलब्धता प्राप्त होते. घरकूल योजनांमधील एका एका घराकरिता विशेष मान्यता प्राप्त होऊन किंवा त्याच्या बांधकामानंतरच्या अनियमिततेची जबाबदारी स्वतंत्ररित्या शासनाची नसते. या योजनांना किंवा घरकुलाच्या प्रस्तावांच्या यादीला एकत्रितपणे प्रशासकीय मान्यता दिली जाते अशी समितीला माहिती दिली. समितीने **अक्कलकुवा या तालुक्यामध्ये ८८ घरकूल योजना, इंदिरा आवास योजनेच्या माध्यमातून मंजूर करण्यात आल्या आहेत, त्यामध्ये ३३ नवीन घरकूल व ५५ घरांची दुरूस्ती करून ती घरे नवीन स्वरूपात दाखवून रक्कम खर्च करण्यात आली आहे. या संदर्भात ज्या यंत्रणेने घरकुल योजना मंजूर केली आहे. त्या यंत्रणेची शासकीय पातळीवरून चौकशी करण्यात यावी व चौकशीअंती आढळून येणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

**गोंदिया, जिल्हापरिषद :**

**(११) जिल्ह्यातील अपूर्ण असलेल्या तलावांची कामे, दुरूस्तीची कामे व नळ पाणीपुरवठा योजनांची कामे :—**

११.१ अनुसूचित जमाती कल्याण समितीची दिनांक ४ ते ६ ऑगस्ट, २०१० रोजी गोंदिया येथे बैठक घेण्यात आली. समितीने जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या यंत्रणानिहाय कामांना भेटी दिल्या. यापैकी जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग या यंत्रणेकडून घेण्यात आलेल्या कामांपैकी वारकरीटोल तलाव, महारीटोला तलाव, धनेगांव तलाव, कुलरभट्टी तलाव इत्यादी प्रकल्प वन विभागाने घेतलेल्या हरकतीमुळे बंद आहेत. उप वनसंरक्षक गोंदिया, वन विभाग यांनी वारकरीटोला व निंबा तलाव प्रकल्पाच्या कामांच्या सद्य:स्थितीबाबत असे कळविले आहे की, वनभंग प्रस्ताव यंत्रणेकडे सुधारित करण्याकरिता पाठविण्यात आलेला असून अद्यापही सुधारित प्रस्ताव यंत्रणेकडून प्राप्त झालेला नाही. याचा अर्थ लघुपाटबंधारे विभागाकडून कार्यवाही झालेली नाही. महारीटोला तलाव, मक्काटोला, सुपरसाल व इतर प्रकल्पांबाबत रकमेचा भरणा करणेबाबत वन विभागाकडून कळविण्यात आले आहे. निंबा तलाव, वारकरीटोला तलाव इत्यादी कामांबाबत त्रुटी पूर्तता करण्यासाठी यंत्रणेस कळविण्यात आले आहे. परंतु, यंत्रणेकडून रकमेचा भरणा करण्यात आलेला नाही व त्रुटींची पुर्तता करण्यात आली नाही. तेव्हा या सर्व प्रकल्पांच्या बाबतित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करून हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे समितीने निदेश दिले. तसेच शासनाने काढलेला शासन निर्णयानुसार वन विभागाच्या प्रस्तावाबाबतचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत. वन विभागाचे अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी एकत्रितरित्या चर्चा करून वन विभागात अडकलेले प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्वरित कार्यवाही करावी. गोंदिया जिल्हा हा अतिसंवेदनशील जिल्हा आहे. कामे पूर्ण होतील अशा योजना या जिल्ह्यामध्ये राबविल्या पाहिजेत. या भागाचा आर्थिक विकास होण्यासाठी या भागातील बहुसंख्य लोक शेती करीत असल्याने त्यांना बाराही महिने शेतीला पाणी मिळाले तर ते काम करू शकतील. वन कायद्यामुळे अनेक प्रकल्पांची कामे प्रलंबित राहिली आहेत. आदिवासींमुळे वनक्षेत्र वाढलेली आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात आठ टक्के सिंचन क्षमता होती. परंतु, ही सिंचनक्षमता आता चार टक्क्यांवर गेली आहे. तसेच जिल्ह्यात एकूण १९२ मामा तलावांची दुरूस्तीची कामे प्रलंबित आहे. मामा तलावांची चांगल्याप्रकारे दुरुस्ती झालेली नाही. गट विकास अधिकाऱ्यांनी मामा तलावांच्या दुरुस्तीबाबत तरतूद करून घ्यावी. मामा तलावांच्या कामांची दुरूस्ती केली तर त्याचा लोकांना फायदा मिळेल, या दृष्टीने त्वरीत कार्यवाही करण्यात यावी, असे समितीचे निदेश दिले.

११.२ दिनांक ११ फेब्रुवारी २०११ रोजी विभागीय सचिवाची साक्ष घेण्यात आली साक्षीच्यावेळी समितीला वन विभागांतर्गत घेण्यात आलेल्या तलावांच्या कामांबाबत पुढीलप्रमाणे लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली.

**वारकरीटोल तलाव :—** सदरहू तलावांचे सुधारित प्रस्ताव तयार करण्यात आले असून मुद्दा क्र. ३१ पुरातत्त्व विभागाचे दिनांक २३ ऑगस्ट २०१० च्या पत्रानुसार प्रमाणपत्राची कार्यवाही सुरू आहे.

**महारीटोला तलाव :—** सदरहू तलावांच्या प्रस्तावास तत्वतः मान्यता प्राप्त असून त्यात एन.पी.व्ही. निधीची रक्कम रुपये ११.५० लक्षची आवश्यकता आहे. सदरहू निधीची मागणी जिल्हानियोजन समितीकडे सन २००९-१० ते सन २०११-१२ मध्ये करण्यात आली असून निधी अद्याप अप्राप्त असल्याने सदरहू काम प्रलंबित आहे.

**धनेगांव तलाव :—** सदर तलावाचे काम १० टक्के पेक्षा कमी झाले असून जवळपास २० वर्षांपासून सदर काम बंद आहे. कामाच्या ठिकाणी तलावाचे कोणतेच अवशेष दिसून येत नाही. या तलावांचे बांधकाम करिता रुपये १०५.०० लक्ष व वन विभागाचा खर्च रुपये १६४.०० लक्ष असे एकूण रुपये २६९.०० लक्ष निधी कामावर खर्च झालेला आहे तो योग्य वाटत नाही. त्यामुळे सदर तलावाचे काम रोहयोतून वगळण्याची व झालेला खर्च क्षमापन करण्याचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

**कुलरभट्टी तलाव :—** सदर तलावाच्या प्रस्तावास तत्वतः मान्यता प्राप्त असून त्यात एन.पी.व्ही. निधीची रक्कम रुपये २१.०० लक्षची आवश्यकता आहे. सदरहू निधीची मागणी जिल्हानियोजन समितीकडे सन २००९-१० ते सन २०११-१२ मध्ये करण्यात आली असून निधी अद्याप अप्राप्त असल्याने सदरहू काम प्रलंबित आहे.

११.३ साक्षीच्यावेळी समितीने वारकरीटोला तलाव, महारीटोला तलाव, धनेगांव तलाव, कुलरभट्टी तलाव इत्यादी प्रकल्प वन विभागाने घेतलेल्या हरकतीमुळे बंद होते या प्रकल्पांची सद्यःस्थिती काय आहे, अशी विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी वारकरीटोल तलावासाठी ३.७७ एकर जमीन संपादनासाठी जिल्हा वन अधिकारी यांच्याकडे (डी.एफ.ओ.) प्रस्ताब सादर केला आहे. महारीटोला तलावाच्या प्रस्तावास तत्वतः मान्यता प्राप्त असून त्यात एन.पी.व्ही. निधीची रक्कम रुपये ११.५० लक्षची आवश्यकता असून सदर निधी अद्याप अप्राप्त असल्याने काम प्रलंबित आहे. धनेगाव तलावाचे काम रोहयोतून वगळयाची व झालेला खर्च क्षमापन करण्याचा प्रस्ताव करण्याची कार्यवाही सुरू आहे. कुलर भट्टी तलावाच्या प्रस्तावास तत्वतः मान्यता प्राप्त असून त्यास एन.पी.व्ही. निधीची रक्कम रुपये २१.०० लक्षची आवश्यकता आहे. सदरहू निधी अप्राप्त असल्याने काम प्रलंबित आहे, असे समितीला सांगितले.

११.४ जिल्ह्यामध्ये जलस्वराज्य अंतर्गत किती कामे पूर्ण झाली व किती कामे अपूर्ण आहेत. या कामांची मूदत संपली आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी जलस्वराज्य योजनेची दोन्ही कामे अपूर्ण राहिली आहेत ती मार्चमध्ये पूर्ण होतील ही अपूर्ण कामे

आदिवासी नसलेल्या भागातील आहेत. आदिवासी भागातील सगळी कामे पूर्ण झालेली आहेत. या सर्व कामांना पाणीपुरवठा सुरू झालेला आहे. समितीने तलावाच्या वेस्टवेअरच्या फुटलेल्या भागाच्या कामांची दुरूस्ती केली आहे काय, एका वेस्टवेअरच्या बांधकामाला समितीने भेट दिली असता तो वेस्टवेअर नादुरूस्त आढळून आला. आदिवासी भागातील बाकीच्या वेस्टवेअरची काय परिस्थिती आहे. गेल्या सहा महिन्यात वेळोवेळी किती वेस्टवेअरच्या दुरूस्त्या केल्या आहेत, अशी विचारणा केली असता कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग यांनी मागील सहा महिन्यात दुरूस्त्या केल्या नाहीत. त्याअगोदर दुरूस्त्या केल्या आहेत, असे समितीला सांगितले. समितीने कोणत्या प्रकारच्या दुरूस्त्या केल्या आहेत, ज्या कामासाठी ६० लाख रुपये खर्च केले आहेत. त्या कामाची परिस्थिती बघितली तर जवळ जवळ १० लाख रुपयाचे ते काम आहे. मामा तलावाच्या दुरूस्तीच्या नावाखाली आदिवासी विभागाच्या निधीची उधळपट्टी केली जात आहे. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग या यंत्रणेकडून करण्यात आलेल्या दुरूस्तीच्या सर्व कामांची अधीक्षक अभियंता यांच्या स्तरावर चौकशी करण्यात यावी, असे समितीने निदेश दिले.

११.५ जिल्ह्यात ग्रामीण पाणीपुरवठ्याच्या किती योजना आहेत त्यापैकी किती प्रादेशिक पाणीपुरवठ्यांच्या योजना बंद आहेत. योजना बंद असण्याची कारणे आहेत. बंद असलेल्या योजना योग्यप्रकारे सुरू करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे अशी समितीने विचारणा केली. कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांनी या यंत्रणेच्या जिल्ह्यात ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या एकूण ४४० योजना आहेत. सर्व योजना सुरू असून, केवळ दोन योजना बंद आहेत. काही ठिकाणी एम.एस.ई.बी.चा सप्लाय मिळत नाही. शिवाय थकबाकी असल्यामुळे कनेक्शन मिळत नाही. तसेच पाणीपट्टीची वसुली होत नसल्यामुळे मेंटेनन्स केला जात नाही. त्यामुळे या दोन योजना बंद आहेत. जिल्ह्यात १५ प्रादेशिक पाणीपुरवठा योजना असून, जिल्हापरिषदेने ताब्यात न घेतल्यामुळे त्या योजना बंद आहेत. परंतु, ज्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना जिल्हापरिषदेकडे आहेत व ज्या १०० टक्के आदिवासी भागातील आहेत त्या सुरू आहेत, असे समितीला सांगितले सामितीने या सर्व योजनेतून आदिवासी भागांमध्ये खरोखरच पाणीपुरवठा होतो की नाही, हे तपासले पाहिजे. जिल्ह्यामध्ये जलस्वराज्य अंतर्गत किती कामे पूर्ण झाली व किती अपूर्ण आहेत, अशी विचारणा केली असता त्यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशी माहिती दिली आहे की, जिल्ह्यामध्ये १०२ पैकी ९७ कामे पूर्ण झाली आहेत. ५ कामे अपूर्ण आहेत. ७२ योजना ग्रामपंचायतीला हस्तांतरित करण्यात आल्या आहेत. १० योजना पूर्णतः ग्रामपंचायतीला हस्तांतरित करणे बाकी आहे, समितीने ग्रामीण पाणीपुरवठा या यंत्रणेकडील योजनाची माहिती समितीला सादर करावी, असे निदेश दिले. समिती ज्यावेळी एखाद्या कामाच्या ठिकाणी भेट देते त्यावेळी तेथे अनेक त्रुटी आढळून येतात. मग असा प्रश्न निर्माण होतो की, आपली यंत्रणा नेमकी काय करते. समितीने पाणीपुरवठा योजनेच्या कामाला भेट दिली होती.

त्या योजनेवर १९ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. पाण्याची टाकी बांधून तयार आहे. त्यासंदर्भात समितीला माहिती द्यावी, अशी विचारणा केली असता कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा यांनी सालेकसा तालुक्यातील लटोरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेला समितीने भेट दिली होती. लटोरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून बांधण्यात आलेली आहे. सदरहू योजनेला दिनांक २१ एप्रिल १९९८ रोजी प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. या योजनेची अंदाजपत्रकीय किंमत १६ कोटी ९४ लाख रुपये आहे. या योजनेमध्ये ३० गावे समाविष्ट आहेत. या योजनेची पाणीपट्टी जास्त असल्यामुळे ग्रामपंचायतीने ही योजना पुढे करण्यास सहमती दाखविली नाही. ही योजना १५ वर्षांपूर्वीची असल्याने बृहत आराखड्यातून ही योजना घेण्यात आली आहे, असे समितीला सांगितले.

११.६ कार्यकारी अभियंता यानी जी गावे पाणीपट्टी भरतील त्यांना ही योजना चालविण्यास देण्यात येईल. ही योजना बृहत आराखड्यातून घेण्यात आलेली आहे. लटोरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना, ता. सालेकसा आणि बनगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना, तालुका आमगाव अशा दोन योजना आहेत. लटोरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेमध्ये ३० गावांचा समावेश आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ही योजना तयार केलेली आहे. योजना बंद असताना सुद्धा काही लोक पैसे देण्यास तयार होते. ज्या लोकांनी पैसे दिलेले आहेत त्यांनाच पाणी मिळणार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जिल्हा परिषद यांच्या समन्वयाने ही योजना झालेली आहे. लटोरी ग्रामपंचायत पैसे देण्यास तयार नव्हती. म्हणून ही योजना सध्या बंद आहे. माननीय राज्यमंत्री महोदयांकडे यासंदर्भात बैठक झाली होती. त्यांनी या योजनेला बायफरगेट करण्यास सांगितलेले आहे. त्यानुसार पाण्याचा सोर्स जवळ असेल तेथून पाणी घेऊन लोकांच्या मागणीनुसार दोन्ही योजना बायफरगेट करण्याची कार्यवाही सुरू आहे, असे समितीला सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :—

११.७ कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग या यंत्रणेकडून जिल्ह्यात घेण्यात आलेल्या वारकरीटोला, महारीटोला, धनेगांव, कुलर भट्टी इत्यादी तलावांच्या कामासंबंधित प्रकल्पांना वन विभागाने घेतलेल्या हरकतीमुळे कामे बंद आहेत. काही तलावांच्या कामांबाबत त्रुटींची पूर्तता करण्यासाठी यंत्रणेकडे पाठविण्यात आलेली असताना यंत्रणेकडून त्रुटींची पूर्तता करण्यात आली नाही व या तलावांच्या रकमेचा भरणा करण्यात आलेला नाही. तेव्हा या सर्व प्रकल्पाबाबत जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व वन विभागाचे अधिकारी यांनी एकत्रितरित्या कार्यवाही करून वन विभागात अडकलेले प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने तातडीने कारवाई करण्यात यावी. तसेच तलावांच्या रकमेचा भरणा व त्रुटींची पूर्तता पूर्ण करण्यास विलंब लावणाऱ्या संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

११.८ उक्त तलावाच्या प्रस्तावास तत्त्वत: मान्यता प्राप्त असून त्यास एन.पी.व्ही. निधीच्या रकमेची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे करण्यात आली आहे. तथापि, निधी अप्राप्त असल्याने तलावांची कामे प्रलंबित आहे. जिल्हा नियोजन समितीकडून त्वरित निधी उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

११.९ जिल्ह्यात एकूण १९२ मामा तलावाच्या दुरूस्तीची कामे झालेली नाही. मागील सहा महिन्यात तलावाच्या दुरूस्तीची कामे करण्यात आलेली नसल्यामुळे मामा तलावाच्या दुरूस्तीच्या नावाखाली आदिवासी विकास विभागाच्या निधीची उधळपट्टी होत आहे. यंत्रणेने कोणत्या प्रकारच्या दुरूस्तीची कामे केली आहे. एखाद्या तलावाच्या दुरूस्तीच्या कामावर १० लक्ष खर्च करावयाचा असतांना त्या ठिकाणी ५० लक्ष खर्च करण्यात आला आहे. म्हणजेच मूळ खर्चाच्या ४ ते ५ पटीने खर्च झालेला आहे. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे या यंत्रणेकडून करण्यात आलेल्या १९२ मामा तलावांच्या दुरूस्तीच्या सर्व कामांची अधीक्षक अभियंता यांच्या स्तरावर चौकशी करण्यात यावी व चौकशी अंती कामात अनियमितता झाली असल्यास संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध करण्यात आलेली कारवाई व चौकशीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

११.१० कार्यकारी अभियंता, जिल्हा ग्रामीण पाणीपुरवठा विभाग या यंत्रणेकडील पाणीपुरवठा योजनेच्या एकूण ४४० योजना पूर्ण झालेल्या आहेत. वीजेची थकबाकी व पाणीपट्टीची वसुली होत नसल्यामुळे केवळ दोन योजना बंद आहेत यंत्रणेकडील बंद असलेल्या दोन पाणीपुरवठा योजनेच्या कामाची चौकशी करून या योजना सुरू करणेबाबत कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तसेच ज्या प्रादेशिक पाणीपुरवठ्याच्या योजना जिल्हा परिषदेच्या ताब्यात व आदिवासी भागात आहेत त्या योजना सुरू आहेत. परंतु, जिल्ह्यातील १५ प्रादेशिक पाणीपुरवठ्याच्या योजना जिल्हा परिषदेने ताब्यात न घेतल्यामुळे त्या योजना बंद आहे. बंद असलेल्या १५ प्रादेशिक पाणीपुरवठ्याच्या योजना जिल्हा परिषदेने ताब्यात घेऊन सुरू करणेबाबत तातडीने कारवाई सुरू करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

११.११ जिल्ह्यात जलस्वराज्य योजने अंतर्गत घेण्यात आलेल्या १०२ कामांपैकी ९७ कामे पूर्ण झाली आहेत. ५ कामे अपूर्ण आहेत. पूर्ण झालेल्या ९७ कामांपैकी ७२ योजना ग्रामपंचायतीला हस्तांतरित करणे बाकी आहे. अपूर्ण असलेली ५ कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने केलेल्या कारवाईचा अहवाल व ग्रामपंचायतीतील हस्तांतरित करावयाच्या १० योजनांबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल

समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा. तसेच उर्वरित १५ कामांबाबत कोणती कारवाई करण्यात आली आहे याबाबतचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

११.१२ महाराष्ट्र जीवन प्राधिकारण व जिल्हा परिषद यांच्या समन्वयाने तयार करण्यात आलेल्या लटोरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना (ता. सालेकसा) आणि बनगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना (ता. आमगाव) या दोन्ही योजना बंद आहेत. दोन्ही योजनेंतर्गत येणारी जी गावे पाणीपट्टी भरतील त्यांना या योजनेचा लाभ मिळणार असल्याने काही लोक पैसे भरण्यास तयार आहेत. बनगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांतर्गत येणाऱ्या गावातील ग्रामपंचायत रक्कम भरण्यास तयार होती परंतु लटोरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेंतर्गत येणाऱ्या गावातील ग्रामपंचायत रक्कम भरण्यास तयार नव्हती त्यामुळे ही योजना बंद आहे. या दोन्ही योजनेंतर्गत येणाऱ्या गावातील लोकांच्या मागणीनुसार ज्या ठिकाणी पाण्याचा सोर्स असेल तेथून पाणी उपलब्ध करून घेतल्यास दोन्ही गावातील लोकांना पाण्याचा उपभोग घेता येईल या दृष्टीने दोन्ही योजना वेगवेगळ्या (By for gate) करण्यात याव्यात व ही योजना सुरू करण्याच्या दृष्टीने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

## (परिशिष्ट)

(१) बीड जिल्ह्यातील खाजगी शिक्षण संस्थेतील अनुसूचित जमाती प्रवर्गाचा अनुशेष

(२) जिल्हापरिषद कार्यालयात अंतर्गत विभाग संवर्गातील अनुसूचित जमाती कर्मचा-यांची जात पडताळणीची प्रलंबित प्रकरणे.

(३) जिल्हापरिषद, नंदूरबार या कार्यालयामधील जात वैधता प्रमाणपत्र व पडताळणी समितीकडे सादर केलेले प्रस्ताव.

# परिशिष्ट " अ "

## एस.टी. प्रवर्गाचा अनुशेष बाबचे प्रपत्र

| अ. क्रं. | संस्थेचे नांव | संवर्ग | मान्य पदे | S.T. साठी राखीव पदे | पैकी भरलेली पदे | शिल्लक अनुशेष | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रगती शिक्षण प्रारक मंडळ बीड बींदू नामावली तपासणी दि : ०४.०८.२००८ | मुख्याध्यापक | ८ | १ | १ | - | ० |
| | | स.शि. | ६५ | ७ | २ | ५ | ३ |
| | | लिपीक | ८ | १ | ० | १ | ० |
| | | सेवक | २८ | ३ | १ | २ | ० |
| २ | लोमान्य शिक्षण संस्था खुंटेफळ ता. आष्टी दि.०६.११.२००८ | मुख्याध्यापक | ५ | १ | ० | १ | १ |
| | | स.शि. | ६३ | ७ | ४ | ३ | ० |
| | | लिपीक | ७ | १ | १ | ० | ० |
| | | सेवक | १९ | २ | २ | ० | ० |
| ३ | नवनिर्माण शिक्षण संस्था भायाळा ता. पाटोदा दि. ०४.०८.०८ | मुख्याध्यापक | ७ | १ | ० | १ | ० |
| | | स.शि. | ८४ | ७ | १ | ६ | १ |
| | | लिपीक | ७ | १ | ० | १ | ० |
| | | सेवक | २५ | ३ | २१ | २ | ० |
| ४ | महर्षी कनाद शिक्षण संस्था परळी वै. | मुख्याध्यापक | १ | ० | ० | ० | ० |
| | | स.शि. | ९ | १ | ० | १ | १ |
| | | लिपीक | १ | ० | ० | ० | ० |
| | | सेवक | ३ | १ | ० | ० | ० |
| ५ | गहिनीनाथ सेवा मंडळ बावी ता. आष्टी दि. ३०.०५.२००९ | मुख्याध्यापक | ३ | १ | ० | १ | ० |
| | | स.शि. | १६ | २ | १ | १ | ० |
| | | लिपीक | ३ | १ | १ | ० | ० |
| | | सेवक | १२ | १ | ० | १ | ० |
| | श्री. मच्छिंद्रनाथ शिक्षण प्रसारक मंडळ निमागाव ता. आष्टी दि. १६.०८.०६ | मुख्याध्यापक | २ | ० | ० | ० | ० |
| | | स.शि. | २० | २ | २ | ० | ० |
| | | लिपीक | २ | ० | ० | ० | ० |
| | | सेवक | ८ | १ | १ | ० | ० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | श्री. मकरध्वज शिक्षण संस्था चिंचवन ता. बीड दि.२१.०८.०८ | मुख्याध्यापक | १ | १ | ० | ० | ० |
| | | स.शि. | २१ | २ | २ | ० | ० |
| | | लिपीक | २ | २ | ० | ० | ० |
| | | सेवक | ५ | १ | १ | ० | ० |
| ८ | गंगावती शिक्षण संस्था चिंचवण ता. वडवणी दि.०७.१२.२००९ | मुख्याध्यापक | १ | ० | ० | ० | ० |
| | | स.शि. | ८ | १ | ० | १ | २ |
| | | लिपीक | १ | ० | ० | ० | ० |
| | | सेवक | ३ | १ | १ | ० | ० |
| ९ | जनता वसतीगृह शिक्षण संस्था आष्टी दि. २१.०६.२०१० | मुख्याध्यापक | २ | ० | ० | ० | ० |
| | | स.शि. | ५४ | ४ | १ | ३ | ० |
| | | लिपीक | ५ | १ | ० | १ | ० |
| | | सेवक. | ७ | १ | १ | ० | ० |
| १० | समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ शिरस मार्ग ता. गेवराइ दि.१३.०७.२०१० | मुख्याध्यापक | ३ | १ | ० | ०१ | ० |
| | | स.शि. | ३८ | ३ | २ | १ | ० |
| | | लिपीक | ४ | १ | १ | ० | ० |
| | | सेवक | १४ | १ | १ | ० | ० |
| ११ | मोहीमाता शिक्षण संस्था मादळमोही ता.गेवराई | मुख्याध्यापक | १ | ० | ० | ० | ० |
| | | स.शि.. | २३ | १ | ० | १ | ० |
| | | लिपीक | २ | ० | ० | ० | ० |
| | | सेवक | ५ | १ | ० | ० | ० |
| १२ | श्री. जालंदर शिक्षण संस्था रायमोहा ता.शिरुर दि.१२..१०.०६ | मुख्याध्यापक | १ | ० | ० | ० | ० |
| | | स.शि. | २७ | २ | २ | ० | ० |
| | | लिपीक | २ | ० | ० | ० | ० |
| | | सेवक | ३ | ० | ० | ० | ० |
| १३ | सिंदफणा शिक्षण प्रसारक मंडळ माजलगांव | मुख्याध्यापक | ६ | १ | १ | [illegible] | ० |
| | | स.शि. | ११६ | ८ | ६ | २ | २ |
| | | लिपीक | ५ | १ | १ | ० | ० |
| | | सेवक | १६ | २ | १ | १ | ० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुख्याध्यापक | २ | ० | ० | ० | ० |
| १४ | के. वसंतदादा प्रतिष्ठाण माजलगांव | स.शि. | १८ | १ | ० | १ | ० |
| | | लिपीक | २ | ० | ० | ० | ० |
| | | सेवक | ८ | १ | ० | १ | ० |
| | | मुख्याध्यापक | ३ | ० | ० | ० | ० |
| १५ | शाईलेश्वर शिक्षण संस्था, माजलगांव ता.माजलगांव | स.शि. | ६९ | ५ | १ | ४ | ० |
| | | लिपीक | ३ | ० | ० | ० | ० |
| | | सेवक | १२ | १ | १ | ० | ० |
| | | मुख्याध्यापक | ३ | ० | ० | ० | ० |
| १६ | जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई | स.शि. | ३७ | ३ | ० | ३ | ० |
| | | लिपीक | ३ | ० | ० | ० | ० |
| | | सेवक | १८ | १ | ० | १ | ० |
| | | मुख्याध्यापक | १५ | १ | १ | ० | ० |
| १७ | जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई ता.गेवराई | स.शि. | २२३ | १५ | ४ | ११ | ० |
| | | लिपीक | १८ | १ | ० | १ | ० |
| | | सेवक | ४६ | ३ | १ | २ | ० |
| | | मुख्याध्यापक | २३ | १ | १ | ० | १ |
| | आदर्श शिक्षण संस्था बीड | स.शि. | ४३२ | ३० | १ | २९ | ० |
| | | लिपीक | २८ | २ | ० | २ | ० |
| | | सेवक | २२३ | १५ | ० | १५ | ० |
| | | मुख्याध्यापक | २४ | १ | ० | १ | ० |
| १९ | शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी | स.शि. | १५० | २२ | १३ | ९ | ० |
| | | लिपीक | २८ | २ | ० | २ | ० |
| | | सेवक | १०२ | ७ | ४ | ३ | ० |
| | | मुख्याध्यापक | १५ | १ | १ | ० | ० |
| 20 | छत्रपती शिवाजी शि.संस्था आडस ता.केज | स.शि. | १५५ | ११ | ० | ११ | ० |
| | | लिपीक | १८ | १ | ० | १ | ० |
| | | सेवक | ५१ | ३ | ० | ३ | ० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | माऊली विद्यापीठ केज | मुख्याध्यापक | ४ | १ | ० | १ | ० | |
| | | स.शि. | १६ | ७ | १ | ६ | ० | |
| | | लिपीक | ४ | १ | ० | १ | ० | |
| | | सेवक | २१ | १ | १ | ० | ० | |
| २२ | भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई | मुख्याध्यापक | ६ | १ | १ | ० | १ | |
| | | स.शि. | १३७ | १३ | ८ | ५ | ० | |
| | | लिपीक | ६ | १ | ० | १ | ० | |
| | | सेवक | १५ | १ | ० | १ | ० | |
| २३ | यशवंतराव चव्हाण विश्वस्त मंडळ, अंबाजोगाई | मुख्याध्यापक | २ | ० | ० | ० | ० | |
| | | स.शि. | २५ | २ | २ | ० | ० | |
| | | लिपीक | ५ | १ | ० | १ | ० | |
| | | सेवक | १२ | १ | ० | १ | ० | |
| २४ | विठ्ठलगड शि.प्र.मंडळ सारणी (सां.) ता.केज | मुख्याध्यापक | ६ | १ | ० | १ | ० | |
| | | स.शि. | ५० | ३ | ० | ३ | ० | |
| | | लिपीक | १७ | १ | ० | १ | ० | |
| | | सेवक | १७ | १ | ० | १ | ० | |
| २५ | आचार्य विनोबा भावे शि.प्र.मंडळ बीड | मुख्याध्यापक | २ | ० | ० | ० | ० | |
| | | स.शि. | ६७ | ५ | ० | ५ | ० | |
| | | लिपीक | ४ | ० | ० | ० | ० | |
| | | सेवक | १२ | १ | ० | १ | ० | |
| २६ | शैल्य मल्लिकार्जून शि.सं. बीड | मुख्याध्यापक | ४ | १ | १ | ० | ० | (७) |
| | | स.शि. | ४० | ३ | ० | ३ | ० | |
| | | लिपीक | ३ | १ | १ | ० | ० | |
| | | सेवक | १८ | १ | १ | ० | ० | |
| २७ | अरुणा असफअली महिला मंडळ बीड | मुख्याध्यापक | ३ | १ | १ | ० | ० | (८) |
| | | स.शि. | [illegible] | ३ | ० | ३ | ० | |
| | | लिपीक | ३ | ० | ० | | ० | |
| | | सेवक | १५ | १ | १ | ० | ० | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुख्याध्यापक | ३ | ० | ० | ० | ० |
| २८ | भगवान विद्या प्रसारक मंडळ, बीड | स.शि. | १६ | ६ | ६ | ० | ० |
| | | लिपीक | ३ | ० | ० | ० | ० |
| | | सेवक | १ | १ | १ | ० | ० |
| | | मुख्याध्यापक | ३ | ० | ० | ० | ० |
| २९ | शोभादेवी महिला सेवाभावी संस्था गेवराई | स.शि. | २५ | २ | ० | २ | ० |
| | | लिपीक | ४ | ० | ० | ० | ० |
| | | सेवक | १२ | १ | ० | १ | ० |
| | | मुख्याध्यापक | ३ | ० | ० | ० | ० |
| ३० | नारायणगड शि.प्र. मंडळ बीड | स.शि. | ६३ | ५ | १ | ४ | ० |
| | | लिपीक | १२ | १ | ० | ० | ० |
| | | सेवक | १५ | १ | ० | १ | ० |
| | | मुख्याध्यापक | २ | ० | ० | ० | ० |
